रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

• वर्ष १७ • अंक २२८
www.ramprahar.com

बुधवार, ५ मार्च २०२५ • पाने ८ • किंमत ₹२



## ऑस्ट्रेलियाला नमवून भारत चॅम्पियन्स ट्रॉफीच्या फायनलमध्ये

**दुबई** : स्टार फलंदाज विराट कोहलीच्या शानदार अर्धशतकाच्या जोरावर (८४ धावा) भारतीय क्रिकेट संघाने मंगळवारी (दि. ४) ऑस्ट्रेलियाचा चार विकेट राखून पराभव केला आणि चॅम्पियन्स ट्रॉफीच्या अंतिम फेरीत दिमाखात प्रवेश केला. दुबईच्या मैदानात रंगलेल्या टीम इंडियाविरुद्धच्या सेमी फायनल लढतीत टॉस जिंकून पहिल्यांदा फलंदाजी करताना ऑस्ट्रेलियाचा संघ निर्धारित ५० षटकेही खेळू शकला नाही. अखेरच्या षटकातील तिसऱ्या चेंडूवर हार्दिक पांड्याने ऑस्ट्रेलियाचा डाव खल्लास केला, तेव्हा त्यांच्या खात्यावर २६४ धावा जमा झाल्या होत्या. ऑस्ट्रेलियाकडून स्मिथ आणि कॅरी यांनी अर्धशतकी खेळी केली. भारताकडून मोहम्मद शमीने सर्वाधिक तीन विकेट्स घेतल्या. वरुण चक्रवर्ती आणि रवींद्र जडेजा यांनी प्रत्येकी दोन विकेट्स आपल्या खात्यात जमा केल्या, तर हार्दिक पांड्या आणि अक्षर पटेल यांना प्रत्येकी एक विकेट घेतली. भारताने ऑस्ट्रेलियाचे आव्हान ४८.१ षटकांत पार करून शानदार विजय साकारला.

# धनंजय मुंडे यांचा राजीनामा

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्याचे अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षणमंत्री आणि राष्ट्रवादी काँग्रसचे नेते धनंजय मुंडे यांनी अखेर आपला राजीनामा दिला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मुंडेंचा राजीनामा स्वीकारला असून पुढील कारवाईसाठी राज्यपालांकडे सोपवला आहे.



बीडच्या मस्साजोगमधील सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणात धनंजय मुंडे यांचे निकटवर्तीय वाल्मिक कराड यांच्यावर खंडणीचा आरोप आहे. याच प्रकरणातून देशमुख यांची हत्या झाली होती. त्यांच्या क्रूर हत्येचे फोटो समोर आल्यानंतर अवघा महाराष्ट्र सुन्न झाला. देशमुख यांच्या हत्याकांडात वाल्मिक कराडचे नाव समोर आल्यानंतर मुंडे यांच्या राजीनाम्याची मागणी होत होती. विरोधकांच्या दबावामुळे मुंडे यांनी मंगळवारी (दि. ४) अखेर राजीनामा दिला.

याबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी माहिती देताना सांगितले की, धनंजय मुंडे यांनी माझ्याकडे राजीनामा सादर केला आहे. मी त्यांचा राजीनामा स्वीकारला असून तो पुढील कारवाईसाठी राज्यपालांकडे पाठवला आहे.

मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांची डिसेंबर २०२४मध्ये अपहरण करून हत्या करण्यात आली होती. त्यानंतर या प्रकरणात सात आरोपींना अटक करण्यात आली आहे, तर एक आरोपी फरार आहे. या हत्याकांडप्रकरणी राज्य गुन्हे अन्वेषण विभागाने बीड जिल्हा न्यायालयात सुमारे १,२०० पानांचे आरोपपत्र सादर केले, ज्यामध्ये देशमुख यांच्या हत्येचा आणि त्यासंबंधित दोन प्रकरणांचा समावेश आहे.

बीडमधील केज पोलीस ठाण्यात सरपंच देशमुख यांची हत्या, आवदा कंपनीला खंडणी मागण्याचा प्रयत्न आणि कंपनीच्या सुरक्षा रक्षकावर हल्ला असे तीन वेगवेगळे गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. आरोपींवर महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायदा (मकोका) अंतर्गत गुन्हा दाखल झाला आहे.

दरम्यान, राजीनामा दिल्यानंतर धनंजय मुंडे यांनी सोशल मीडिया प्लॅटफॉर्म एक्सवरून पोस्ट केली. यात त्यांनी म्हटलेय की, बीड जिल्ह्यातील मस्साजोगचे स्व. संतोष देशमुख यांच्या निर्घृण हत्येतील आरोपींना कठोरात कठोर शिक्षा व्हावी, ही माझी पहिल्या दिवसापासूनची ठाम मागणी आहे. काल समोर आलेले फोटो पाहून तर मन अत्यंत व्यथित झाले. या प्रकरणाचा तपास पूर्ण झाला असून आरोपपत्र न्यायालयात दाखल झाले आहे तसेच, न्यायालयीन चौकशीही प्रस्तावित आहे. माझ्या सदसद्विवेकबुद्धीला स्मरून आणि मागील काही दिवसांपासून माझी प्रकृती ठीक नसल्याने पुढील काही दिवस उपचार घेण्याचा सल्ला डॉक्टरांनी दिला आहे. त्यामुळे वैद्यकीय कारणास्तवसुद्धा मी मंत्रिमंडळातून माझ्या मंत्रिपदाचा राजीनामा मुख्यमंत्री महोदयांकडे दिला आहे.

### मंत्रिपदासाठी राष्ट्रवादीतील चार नेत्यांची नावे चर्चेत

राज्याचे अन्न व नागरी पुरवठामंत्री धनंजय मुंडे यांच्या राजीनाम्यानंतर रिक्त झालेल्या मंत्रिपदी कोणाला संधी मिळणार याबाबत आता राजकीय वर्तुळात उत्सुकता निर्माण झाली आहे. राष्ट्रवादीचे ज्येष्ठ नेते छगन भुजबळ यांचे या निमित्ताने पुनर्वसन करण्याचा प्रयत्न पक्षाकडून केला जाण्याची शक्यता आहे. त्यांच्यासह बीड जिल्ह्यातील राष्ट्रवादीच नेते आणि पाचव्या टर्मचे आमदार प्रकाश सोळंके हेदेखील मंत्रिपदाच्या स्पर्धेत आघाडीवर आहेत. एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील महायुती सरकारमध्ये मंत्री असलेले राष्ट्रवादीचे नेते अनिल पाटील यांना विद्यमान सरकारमध्ये मंत्रिमंडळात संधी मिळाली नव्हती. आता त्यांच्याही नावाचा विचार केला जाऊ शकतो. संजय बनसोडे हेदेखील गेल्या वेळी कॅबिनेट मंत्री होते, मात्र यंदा त्यांनाही संधी देण्यात आली नव्हती. मंत्रिपदाची एक जागा रिक्त झाल्यानंतर त्यांच्या नावाचा विचार होतो का हे पहावे लागेल.

# नद्यांच्या प्रदूषणाचा प्रश्न विधीमंडळात

## आमदार प्रशांत ठाकूर, महेश बालदी यांची प्रदूषण रोखण्यासाठी कार्यवाहीची मागणी

**पनवेल, मुंबई : रामप्रहर वृत्त**

ठाणे व रायगड जिल्ह्यातील एमआयडीसीमधील अनेक कंपन्यांतून सोडण्यात येणाऱ्या रसायनमिश्रित पाण्यामुळे नद्यांच्या प्रदूषणात वाढ झाली आहे. याबाबत आमदार प्रशांत ठाकूर आणि आमदार महेश बालदी यांनी मुंबईत सुरू असलेल्या विधीमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात प्रश्न दाखल करून शासनाचे लक्ष वेधले.




पनवेल तालुक्यातील तळोजा एमआयडीसीतील घातक व रसायनमिश्रीत पाणी कासाडी नदीत सोडणे तसेच ठाणे जिल्ह्यातील अंबरनाथ, बदलापूर, टिटवाळा, उल्हासनगर, डोंबिवली येथील एमआयडीसीमधून अनेक कंपन्या तसेच जीन्स वॉश करणाऱ्या कंपन्या रसायनमिश्रीत पाणी वालधुनी व उल्हास नदीत सोडत असल्याने नदीच्या प्रदूषणात मोठ्या प्रमाणात वाढ होऊन नागरिक तसेच शेती व जलचरांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत असल्याचे निदर्शनास आले आहे. याशिवाय पेण तालुक्यातील डोलवी येथील धरमतर खाडीच्या बाजूला जेएसडब्ल्यू कंपनी तसेच अलिबाग तालुक्यातील शहाबाज येथील पीएनपी कंपनीतील रसायनमिश्रित दूषित पाण्यामुळे मासेमारी व्यवसाय धोक्यात आला आहे. त्या अनुषंगाने याबाबत अभ्यास करण्यासाठी वरिष्ठ वैज्ञानिक तथा वैज्ञानिक कारभार प्रमुख, केंद्रीय सागरी मस्त्यकी संशोधन संस्था मुंबई यांच्या अध्यक्षतेखाली गठीत करण्यात आलेल्या समितीमार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे; त्याचबरोबर या सर्व ठिकाणच्या नद्यांचे प्रदूषण रोखण्याबाबत अनेक लोकप्रतिनिधींनी व नागरिकांनी वेळोवेळी प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे व प्रशासनाकडे तक्रार व निवेदने दिले असून या संदर्भात कोणती कार्यवाही करण्यात आली? या सर्व प्रकरणांची शासनाने सखोल चौकशी करून प्रदूषण रोखणे तसेच यास जबाबदार असणाऱ्या कंपन्या व दोषी अधिकारी, कर्मचारी यांच्याविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, असा तारांकित प्रश्न आमदार प्रशांत ठाकूर आणि आमदार महेश बालदी यांनी अधिवेशनात दाखल केला होता.

राज्याच्या पर्यावरण व वातावरणमंत्री पंकजा मुंडे यांनी या प्रश्नावर दिलेल्या लेखी उत्तरात सांगितले की, तळोजा एमआयडीसीतील घातक व रसायनमिश्रीत पाणी कासाडी नदीत सोडणे आणि ठाणे जिल्ह्यातील अंबरनाथ, बदलापूर, टिटवाळा, उल्हासनगर, डोंबिवली येथील एमआयडीसीमधून अनेक कंपन्या तसेच जिन्स वॉश करणाऱ्या कंपन्या रसायनमिश्रीत पाणी वालधुनी व उल्हास नदीत सोडले जात असल्याने नदीच्या प्रदूषणात मोठ्या प्रमाणात वाढ होऊन नागरिक तसेच शेती व जलचरांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत असल्याचे निदर्शनास आल्याची बाब अंशतः खरी आहे. तळोजा औद्योगिक वसाहतीमधील औद्योगिक सांडपाणी भूमिगत पाईपलाईनद्वारे सीईटीपीमध्ये एकत्रित करून राष्ट्रीय समुद्र विज्ञान संस्थेमार्फत निर्देशितस्थळी विसर्ग करण्यात येते. (पान २ वर..)

## राज्य परिवहन महामंडळातील कर्मचाऱ्यांच्या प्रश्नांबाबतही वेधले शासनाचे लक्ष

**पनवेल, मुंबई : रामप्रहर वृत्त**

राज्य परिवहन महामंडळातील कर्मचाऱ्यांच्या प्रश्नांवर आमदार प्रशांत ठाकूर आणि आमदार महेश बालदी यांनी विधीमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या माध्यमातून शासनाचे लक्ष वेधले.

राज्यातील राज्य परिवहन महामंडळातील कर्मचाऱ्यांना दरमहा ७ तारखेपर्यंत वेतन न मिळणे, महागाई भत्याच्या फरकाची थकबाकी, वार्षिक वेतनवाढ फरक, घरभाडे भत्ता, सुधारीत महागाई भत्ता इ. लागू करणे, कोविड भत्ता, मेडिक्लेम कॅशलेस, शिस्त व आवेदन पद्धतीत बदल करणे, शासनाने राज्य परिवहन महामंडळाला स्वमालकीच्या बसेस देणे इ. राज्य परिवहन महामंडळाचे विविध प्रश्न प्रलंबित असल्याचे डिसेंबर २०२४मध्ये निदर्शनास आले आहे. महामंडळातील कर्मचाऱ्यांचे पीएफ आणि ग्रॅज्युएटीचे दोन स्वतंत्र ट्रस्ट असून ८९ हजार अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या वेतनातून कपात केलेली भविष्य निधीची रक्कम गत १० महिन्यांपासून ट्रस्टमध्ये जमा न केल्यामुळे अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या पीएफचे ११०० कोटी आणि उपदानाचे १००० कोटी असे एकूण २१०० कोटी रुपये प्रलंबित असल्याचे जानेवारी २०२५मध्ये निदर्शनास आले आहे. परिणामी कर्मचाऱ्यांना हक्काची रक्कम काढण्यास अडचणी निर्माण होत असून या प्रलंबित अडचणींमुळे कर्मचाऱ्यांना आर्थिक समस्यांना सामोरे जावे लागत आहे. त्यामुळे राज्य परिवहन महामंडळातील कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित मागण्यांसदर्भात वेळोवेळी लोकप्रतिनिधींनी, कर्मचारी व अधिकाऱ्यांनी, विविध संघटनांनी मा. परिवहन मंत्री महोदयांकडे निवेदन दिली असून या प्रकरणी शासनाने चौकशी करुन राज्य परिवहन महामंडळातील कर्मचाऱ्यांची सर्व थकित देयके व मागण्या पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली अथवा करण्यात येत आहे, अशी विचारणा तारांकित प्रश्नाद्वारे करत एसटी अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या समस्या आमदार प्रशांत ठाकूर आणि आमदार महेश बालदी यांनी शासन दरबारी मांडल्या.

या संदर्भात राज्याचे परिवहनमंत्री प्रताप सरनाईक यांनी लेखी उत्तर दिले असून त्यांनी दिलेल्या उत्तरात म्हटले की, (पान २ वर..)

## निवडक

### अयोध्येतील राम मंदिरावर हल्ल्याचा कट; एकाला अटक

**अयोध्या** : येथील राम मंदिराला लक्ष्य करण्याचा कट रचणारा संशयित आरोपी अब्दुल रहमान (१९) याला हरियाणातील फरीदाबाद येथून अटक करण्यात आली आहे. गुजरातमधील दहशतवादीविरोधी पथक (एटीएस) आणि फरीदाबाद स्पेशल टास्क फोर्स (एसटीएफ) यांनी ही संयुक्त कारवाई केली. आरोपीकडून दोन हँड ग्रेनेड जप्त करण्यात आले असून या प्रकरणी अधिक तपास सुरू आहे.

### ऑलिम्पिक पदक विजेत्या सुशील कुमारला जामीन

**नवी दिल्ली** : दोन वेळचा ऑलिम्पिक पदक विजेता कुस्तीपटू सुशील कुमार याला दिल्ली उच्च न्यायालयाने जामीन मंजूर केला आहे. सुशील कुमारला ज्युनियर राष्ट्रीय कुस्ती विजेता सागर धनखड याच्या हत्येप्रकरणी मे २०२१मध्ये अटक करण्यात आली होती. तेव्हापासून तो तिहार कारागृहात कैद आहे. न्यायाधीश संजीव नरुला यांनी मंगळवारी (दि. ४) सुशीलला ५० हजार रुपयांच्या जातमुचलक्यावर जामीन मंजूर केला.

## ताम्हिणी घाटात कार-बसचा अपघात; दोन जणांचा मृत्यू; तीन जखमी



**माणगाव : बातमीदार, प्रतिनिधी**

ताम्हिणी घाटात माणगाव तालुक्यातील रेस्ट हाऊसच्या अलीकडे एसटी बस आणि कारचा मंगळवारी (दि. ४) दुपारी भीषण अपघात झाला. या अपघातात दोन जणांचा मृत्यू झाला तिघी जखमी झाल्या आहेत.

खेड-चिंचवड ही एसटी बस (एमएच २० बीएल २७७१) पुण्याच्या दिशेकडे जात होती, तर स्विफ्ट कार माणगावच्या दिशेकडे येत होती. उतार व वेग असल्यामुळे तसेच गाडीवरील ताबा सुटल्याने स्विफ्ट कार (एमएच १२ एनयू ६७३१) एसटी बसला समोर जाऊन धडकली. ही धडक एवढी जोरदार होती की, यामध्ये स्विफ्ट चालकाच्या बाजूचा भाग बसमध्ये शिरून पूर्ण चेपला गेला.

या अपघातात स्विफ्ट कार चालविणारे मानसकुमार निरंजन साहू (वय ३८, रा. पौड), सखुबाई तुकाराम कानवडे (वय ६५, रा. मुळशी, पुणे) यांचा मृत्यू झाला, तर पाठीमागे बसलेल्या रूपाली मानस साहू (वय २८), ताराबाई बाळू नलावडे (वय ४५) व रमा मानस साहू (वय ७) या तिघी जखमी झाल्या. जखमींना माणगाव येथील उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

## लाडक्या बहिणींना मिळणार डबल गिफ्ट!

**मुंबई : प्रतिनिधी**

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेतील लाभार्थी महिलांना दिलासा देणारी बातमी आहे. येत्या ७ मार्चपर्यंत लाडक्या बहिणींच्या खात्यामध्ये फेब्रुवारी महिन्याचे दीड हजार आणि मार्च महिन्याचे दीड हजार असे एकूण तीन हजार रुपये जमा होणार आहेत. सरकारकडून या महिन्यात लाभार्थी महिलांना डबल गिफ्ट मिळणार आहे.

याबाबत महिला व बालविकासमंत्री आदिती तटकरे यांनी एक्सवर पोस्ट करत माहिती दिली. महिला दिनाच्या पूर्वसंध्येला मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेतील सर्व पात्र लाभार्थ्यांना फेब्रुवारी व मार्च महिन्याचा लाभ दिला जाणार आहे. ७ मार्चपर्यंत सर्व पात्र लाभार्थ्यांच्या बँक खात्यात दोन महिन्यांचा सन्मान निधी तीन हजार रुपये जमा करण्यात येईल, असे मंत्री तटकरे यांनी पोस्टमध्ये म्हटले आहे.

# रायगड जिल्हा रुग्णालयाच्या नूतन इमारतीचे आज भूमिपूजन

### आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांच्या हस्ते सोहळा

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा सामान्य रुग्णालयाच्या नवीन सात मजली इमारतीचे भूमिपूजन बुधवारी (दि. ५) सायंकाळी ४ वाजता राज्याचे सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याणमंत्री प्रकाश आबिटकर यांच्या हस्ते होणार आहे. दीडशे कोटी रुपये खर्चून ही नवीन इमारत बांधली जाणार आहे.

या समारंभाला महिला व बालविकासमंत्री आदिती तटकरे, रोजगार हमी योजना, फलोत्पादन व खारभूमी विकासमंत्री भरत गोगावले, खासदार सर्वश्री सुनील तटकरे, श्रीरंग बारणे, धैर्यशील पाटील, आमदार सर्वश्री रविशेठ पाटील, प्रशांत ठाकूर, महेश बालदी, महेंद्र थोरवे, महेंद्र दळवी, निरंजन



डावखरे, ज्ञानेश्वर म्हात्रे, विक्रांत पाटील यांची प्रमुख उपस्थिती असणार आहेत.

जिल्हा रुग्णालयाची इमारत जीर्ण झाली होती. दरवर्षी कोट्यवधी रुपयांचा निधी खर्च करूनही ही या इमारतीची पडझड सुरूच होती. ही बाब लक्षात घेऊन नवी इमारत उभारण्यात यावी अशी मागणी सातत्याने केली जात होती. ती मान्य करण्यात आली. नवीन इमारतीच्या बांधकामासाठी राज्य सरकारच्या उच्चाधिकार समितीने एकूण साडेचारशे कोटींच्या प्रस्तावाला मंजुरी दिली आहे. दोन लाख चौरस फुटाची सात मजल्यांची सुसज्ज इमारत बांधली जाणार असून ३०० खाटांच्या या नवीन इमारतीसाठी पहिल्या टप्प्यात १५० कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित आहे. पुण्यातील कंपनीला या कामाची निविदा देण्यात आली आहे.

केंद्राच्या नियमानुसार अद्ययावत असे बांधकाम केले जाणार आहे, ज्यात २० खाटांचा अतिदक्षता विभाग, १६ खाटांचे नवजात बालक उपचार कक्ष आणि २० खाटांच्या डायलेसिस युनिटचा समावेश असणार आहे. अपघात विभागासाठी स्वतंत्र शस्त्रक्रिया कक्षही उभारला जाणार आहे. इमारतीत पाच अत्याधुनिक यंत्र सामुग्रीसह शस्त्रक्रिया कक्षही बांधले जाणार आहेत.

# पनवेल मनपातर्फे महिला दिनानिमित्त हिरकणी महोत्सव

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने पनवेल महानगरपालिकेतर्फे ७ मार्च रोजी भव्य दिव्य असा हिरकणी महोत्सव -सन्मान महिलांचा कार्यक्रमाचे आयोजन आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात करण्यात आले आहे.

या महोत्सवासाठी प्रमुख अतिथी म्हणून राज्याच्या महिला व बालकल्याणमंत्री आदिती तटकरे, नगर विकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ, आमदार डॉ. मनीषा कायंदे, आमदार प्रशांत ठाकूर, आमदार विक्रांत पाटील यांची उपस्थिती लाभणार आहे. विशेष आकर्षण महिलांसाठी फिटनेस फंडा सिने अभिनेत्री भार्गवी चिरमुले यादेखील उपस्थित राहणार आहेत.

या महोत्सवात बचत गटाचे ७, ८ व ९ हे तीन दिवस ३० स्टॉल्स असणार आहेत. ७ मार्च रोजी सकाळी १० वाजता बचत गटांच्या स्टॉलचे तसेच आरोग्य शिबिराचे उद्घाटन होऊन महोत्सवाची सुरुवात होणार आहे.

महिलांसाठी स्वसंरक्षणाचे प्रात्यक्षिक अलिबाग येथील स्वयंसिद्धाच्या संचालिका राष्ट्रीय पारितोषक विजेत्या तपस्वी गोंधळी आणि त्यांचे सहकारी सादर करणार आहेत.

आजकाल होणाऱ्या सायबर फसवणुकीपासून आपला बचाव व्हावा याकरिता नवी मुंबईतील सायबर सेलचे पोलीस निरीक्षक सायबर फसवणूक आणि त्यापासून बचाव या विषयी मार्गदर्शन करणार आहेत. याचबरोबर सिने अभिनेत्री भार्गवी चिरमुले या महिलांसाठी फिटनेसबाबत मार्गदर्शन करणार आहेत तसेच त्यांची प्रगट मुलाखतदेखील घेण्यात येणार आहे

दुपारच्या सत्रात खेळ पैठणीचा आवाज पनवेलचा हा महिलांसाठी लोकप्रिय असा कार्यक्रम सादर होईल. या कार्यक्रमात तीन विजेत्या महिलांना पैठणीची विशेष भेट देण्यात येईल तसेच महिलांसाठी गीत, संगीत, गायन, नृत्य, महाराष्ट्राची लोक संस्कृती असा बहारदार सांस्कृतिक कार्यक्रम सादर होईल. या कार्यक्रमात उपस्थित महिलांनाही सहभागी होता येईल. सर्व कार्यक्रमाचा लाभ पनवेल महापालिका हद्दीतील महिलांनी घ्यावा, असे आवाहन आयुक्त तथा प्रशासक मंगेश चितळे यांनी केले आहे.



**लॉटरीद्वारे भेटवस्तू**

कार्यक्रम पनवेल महापालिका हद्दीतील महिलांसाठी आहे. या वेळी उपस्थित राहणाऱ्या महिलांना लॉटरीद्वारे भेटवस्तू देण्यात येतील. याशिवाय मतदान जनजागृती, बेटी बचाओ बेटी पढाओ आणि आकर्षक असे फुलांचे सेल्फी पॉइंटदेखील या ठिकाणी असणार आहेत.

## पंतप्रधान मोदींच्या हस्ते वनतारा वाईल्डलाईफचे उद्घाटन

**गांधीनगर** : गुजरातमधील वन्यजीव बचाव, पुनर्वसन आणि संवर्धन केंद्र असलेल्या वनतारा वाईल्डलाईफचे उद्घाटन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते मंगळवारी (दि. ४) करण्यात आले. वनतारामध्ये सध्या दोन हजाराहून अधिक प्रजाती आणि दीड लाखांहून अधिक संकटात सापडलेल्या आणि धोक्यात आलेल्या प्राण्यांची काळजी घेतली जाते.



या वेळी पंतप्रधान मोदींनी वनतारा येथील प्राण्यांना देण्यात येणाऱ्या सुविधांची पाहणी केली तसेच विविध ठिकाणाहून सुटका करण्यात आलेल्या प्राण्यांच्या विविध प्रजातींना भेट देऊन त्यांना खायला दिले. पंतप्रधानांनी वनतारा येथील वन्यजीव रुग्णालयाला भेट दिली आणि केंद्रातील विविध सुविधा पाहणाऱ्या डॉक्टर, सहाय्यक कर्मचारी आणि मजुरांशीही चर्चा केली.

# अबू आझमी नरमले!

## औरंगजेबाबद्दलचे 'ते' वक्तव्य मागे

**मुंबई : प्रतिनिधी**

मुघल शासक औरंगजेबाबाबत केलेल्या वक्तव्यावरून झालेली टीका आणि विधानसभेत आमदारांनी व्यक्त केलेल्या संतापानंतर समाजवादी पक्षाचे नेते व मानखुर्द-शिवाजीनगरचे आमदार अबू आझमी यांनी त्यांचे वक्तव्य मागे घेतले आहे. या संदर्भात त्यांनी एक्स प्लॅटफॉर्मवर एक व्हिडीओ जारी केला आहे.

सपाचे नेते आमदार अबू आझमी यांनी सोमवारी प्रसारमाध्यमांशी बोलताना, औरंगजेब हा उत्तम प्रशासक होता. छत्रपती संभाजी महाराज आणि औरंगजेब यांच्यातील लढाई सत्तेसाठी होती, धर्मासाठी नव्हती, असे म्हटले होते. या वक्तव्याचे पडसाद मंगळवारी



(दि. ४) सलग दुसऱ्या दिवशी विधीमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात उमटले. आमदारांनी वक्तव्यावरून खडे बोल सुनावले.

यानंतर आझमींनी व्हिडीओत म्हटले, माझ्या वक्तव्याचा चुकीचा अर्थ काढला गेला. मी छत्रपती शिवाजी महाराज, संभाजी महाराज किंवा अन्य कुठल्याही महापुरुषाबद्दल अपमानजनक वक्तव्य केले नाही. तरीदेखील कोणाच्या भावना दुखावल्या गेल्या असतील तर मी माझे शब्द व संपूर्ण वक्तव्य मागे घेतो.

# रेवस-रेड्डी सागरी महामार्गाच्या प्रकल्पाला गती देण्याचे निर्देश

**मुंबई : रामप्रहर वृत्त**



रेवस-रेड्डी सागरी महामार्ग कोकण सागरी किनाऱ्यांना रस्ते मार्गाने जोडणारा महत्त्वाकांक्षी प्रकल्प असल्याने या प्रकल्पाला अधिक गती देण्याचे निर्देश देण्यात आले आहेत

रेवस-रेड्डी सागरी महामार्गाच्या कामकाजाचा आढावा घेण्यासाठी विधानसभा अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर यांच्या अध्यक्षतेखाली विशेष बैठक विधानभवनातील त्यांच्या दालनात पार पडली. या वेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, एमएसआरडीसीचे व्यवस्थापकीय संचालक अनिलकुमार गायकवाड तसेच संबंधित विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

या बैठकीत सदर प्रकल्पाची आणि भूसंपादनाची सद्यस्थिती याबाबत सादरीकरण करण्यात आले. यावेळी या प्रकल्पाला गती देऊन हा प्रकल्प लवकरात लवकर पूर्ण करण्यासाठी भूसंपादन प्रक्रिया अधिक जलदगतीने करावी, कोकण सागरी किनाऱ्यांना रस्तेमार्गाने जोडणारा हा अत्यंत महत्त्वाकांक्षी प्रकल्प असल्याने या प्रकल्पाला अधिक गती द्यावी, असे निर्देश देण्यात आले.

# चवदार तळ्यावरील कार्यक्रम दिमाखदार करण्याच्या जिल्हाधिकाऱ्यांच्या सूचना

**रायगड : रामप्रहर वृत्त**



ऐतिहासिक चवदार तळे सत्याग्रहाचा ९८वा वर्धापन २० मार्चला महाड येथे साजरा होत आहे. तसेच मोठया संख्येने अनुयायी येतात. हे लक्षात घेता आरोग्य, पाणी, स्वच्छतागृह यांसह सर्व आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी सर्व विभागानी नियोजन करावे. तसेच या सोहळ्याचे दिमाखदार आयोजन करावे असे निर्देश जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी दिले.

महाड चवदार तळे सत्याग्रह वर्धापन दिन कार्यक्रमाच्या नियोजनाच्या अनुषंगाने सर्व शासकीय यंत्रणाच्या कामाचा आढावा जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी आज जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित आढावा बैठकीत घेतला. चवदार तळ्याचे आंतरराष्ट्रीय महत्व लक्षात घेता कार्यक्रमाचे नियोजन दर्जेदार व उत्कृष्ट करण्याच्या सूचना जिल्हाधिकारी जावळे यांनी संबंधित यंत्रणेला दिल्या.

जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित या बैठकीस उपजिल्हाधिकारी रविंद्र शेळके, उपमुख्य कार्यकारी अधिकारी शुभांगी नाखले,तहसीलदार महाड महेश शितोळे, यांसह विविध विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

या वेळी नगर परिषदेमार्फत चवदार तळे, भीमनगर, क्रांती स्तंभ, स्मारक परिसराची साफसफाई करण्यात यावी शहरातील विविध ठिकाणी विद्युत रोषणाई व सुशोभिकरण करावे. तसेच क्रांती स्तंभ परिसरात १०० मोबाईल शौचालये, स्नानगृहे उभारण्यात यावेतअशा सूचना दिल्या. महाड ग्रामीण रुग्णालयाच्या मार्फत रुग्णवाहिका तसेच पुरेसा औषध साठा व आरोग्य पथक तैनात राहील याची दक्षता घ्यावी. याबरोबरच अखंडित वीजपुरवठा तर अनुयायींची वाहतूक व्यवस्था सुरळीत व्हावी, यासाठी नियोजन करण्याच्या सूचना जिल्हाधिकारीजावळे यांनी यावेळी दिल्या.

या काळात कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होणार नाही खबरदारी पोलीस यंत्रणेने घ्यावी.वाहतुकीचे नियोजन करावे. तसेच शासकीय मानवंदना देण्यात यावी. एसटी महामंडळाच्या वतीने १९ ते २१ मार्च या कालावधीत माणगाव, वीर, वामने व करंजाडी रेल्वे स्थानक ते महाड शहर अशी जादा बस व्यवस्था केली जाणार आहे. या नियोजनावर यावेळी चर्चा करण्यात आली. तसेच या ठिकाणी येणाऱ्या अनुयायी यांना पिण्याचे पाणी, सावली साठी मंडप तसेच संपूर्ण परिसरात दिशा दर्शक फलक लावण्यात यावेत.

# ग्रामीण महिलांना मिळाली जगण्याची नवी 'उमेद'; रायगड जिल्ह्यातील हजारो भगिनींना रोजगार

**अलिबाग : प्रतिनिधी**

शहरी भागाबरोबरच ग्रामीण भागातील महिलांनीही आर्थिकदृष्ट्या सक्षम व्हावे व स्वतःच्या पायावर उभे राहावे, यासाठी 'उमेद'च्या माध्यमातून केंद्र सरकारकडून फिरता निधी जिल्ह्यात वितरित करण्यात येत आहे. यातून ४२ हजार महिलांचा आर्थिक स्तर उंचावल्याचा दावा करण्यात येत आहे. आतापर्यंत तीन कोटी रूपयांचा निधी उपलब्ध झाला असून आर्थिक मागास महिलांना शाश्वत उपजिविकेचे साधन मिळाले असून जगण्याची नवी उमेद प्राप्त झाली आहे.

बचत गटांच्या माध्यमातून महिलांच्या आर्थिक उत्पन्नात भर पडावी, यासाठी ग्रामीण भागात 'उमेद' अंतर्गत कामकाज केले जाते. या कामाला गती देण्यासाठी केंद्र सरकारने पुढाकार घेतला आहे. २०२० मध्ये केंद्र सरकारकडून सर्वेक्षण करण्यात आल्यावर काही जिल्ह्यांवर विशेष लक्ष केंद्रित करण्यात आले. 'उमेद'ने आतापर्यंत रायगड जिल्ह्यात १९ हजार २१५ बचत गट तयार केले असून ३१ हजार महिला या माध्यमातून जोडल्या गेल्या आहेत. त्यांची बचत काही लाखांच्या घरात असून गावपातळीवरील कौटुंबिक आर्थिक स्तर उंचावल्याचे दिसते.

बचत गटांमुळे ग्रामीण भागातील अनेक महिलांना रोजगार मिळाला आहे. स्थानिक खाद्यपदार्थ बनवणे, सुकी मासळीसह कोकम, आवळा सरबत बनवणे, याशिवाय हस्तकलेच्या वस्तू बनवण्यासाठी खास प्रशिक्षणही दिले जात आहे.

कौशल्य विकासावर भर महिलांना कम्युनिटी इन्व्हेस्टमेंट फंडातून एका गटाला ६० हजार याप्रमाणे गावातील गटांना निधी देण्यात आला. याशिवाय प्रत्येक महिलांना १५ हजार रुपयांप्रमाणे फिरता निधी मिळाला आहे.

### *काय आहे अभियान*

***महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान (उमेद) हे अभियान, राज्यातील गरीबी कमी करण्यासाठी राबवण्यात येत आहे. या अभियानाचा मुख्य उद्देश, गरीब कुटुंबांना स्वयंसहाय्यता गट आणि बचत गटाद्वारे संघटीत करून त्यांना शाश्वत रोजगार उपलब्ध करून देणे हा आहे. या अभियानातून गरीब कुटुंबातील महिलांना संघटीत करून त्यांना शाश्वत रोजगार उपलब्ध करून देण्यात येत आहे. स्वयंसहाय्यता गट, बचत गट याद्वारे स्त्रियांचे संघटन करून त्यांच्यातील उद्योजकतेला चालना दिली जात आहे. गरीब कुटुंबांना शाश्वत उपजीविकेच्या माध्यमातून गरिबीतून बाहेर काढण्यात येत आहे.***

# स्वामी नारायण केंद्रातर्फे स्वच्छता अभियान

***उरण : वार्ताहर***



बिएपीएस स्वामी नारायण संस्कार केंद्र उरण येथे सोमवार (दि. ३) सकाळी ९ ते दुपारी १ वाजेपर्यंत बिएपीएस मोरा येथील महिला मंडळ वतीने स्वच्छता अभियानाचे आयोजन करण्यात आले होते. सुमारे १५ महिला सत्संगी सहभागी झाल्या होत्या. प्रत्येक महिन्यात हा उपक्रम घेण्यात येतो. स्वामी नारायण संस्कार केंद्र परिसर स्वच्छ केला जातो.

या वेळी उरणचे राजेश पटेल, मोरा मंडळ संचालक शशिकांत कोळी, मनन पटेल, कनुभाई पटेल, मंदिराचे पुजारी अविनाश कोळी, महिला सत्संगी आदी उपस्थित होते.

संस्कार केंद्रात दररोज सकाळी ७.३० वाजता व सायंकाळी ७ वाजता आरती झाल्यावर सत्संग सभा होत असते. प्रत्येक मंगळवारी रात्रो ९ ते १०.३० वाजेपर्यंत सत्संग सभा घेतली जाते. यासाठी मुंबई (दादर) येथून स्वामी नारायण मंदिरातून पूज्य संत येऊन प्रवचन करीत असतात. या सेवेचा लाभ सर्वांनी घ्यावा, असे राजेश पटेल यांनी विनंती केली आहे.

# रायगड जिल्ह्यात न्याय आपल्या दारी!

## फिरते लोक अदालतचे जिल्हा न्यायालयात उद्घाटन

**अलिबाग : प्रतिनिधी**



ग्रामीण भागातील जनसामान्यांना आर्थिक वा अन्य अडचणींच्या कारणास्तव न्याय व्यवस्थेपर्यंत पोहोचता येत नाही. परिणामी, त्यांना न्यायापासून वंचित राहावे लागते, अशी परिस्थिती राहू नये, याकरिता मुंबई उच्च न्यायालय विधि सेवा समितीच्या आदेशान्वये रायगड जिल्हा विधि सेवा प्राधिकरणाच्या वतीने जिल्ह्यात 'न्याय आपल्या दारी' ही संकल्पना अमलात आणण्यात आली आहे. त्या अनुषंगाने रायगड जिल्ह्यात ३ ते २९ मार्च या कालावधीमध्ये मोबाईल व्हॅन द्वारे लोक अदालतीचे व विधी सेवा समितीचे जनजागृतीचे कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत. त्यांचे उद्घाटन प्रभारी प्रमुख जिल्हा न्यायाधीश सृष्टी निळकंठ, वकील संघटना अध्यक्ष ॲड प्रसाद पाटील यांच्या उपस्थितीत करण्यात आले.

'न्याय आपल्या दारी' या फिरत्या लोक अदालतीकरिता निवृत्त न्यायाधीश श्रीकांत उपाध्ये यांची कक्ष न्यायाधीश म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. जिल्हा न्यायालयाच्या आवारात जिल्हा न्यायाधीश क्र. २ एन. के. मणेर, वरिष्ठ न्यायाधीश अमोल शिंदे जिल्हा न्यायालयातील सर्व न्यायाधीश, न्यायिक वर्ग कर्मचारी यांच्या उपस्थितीत या फिरत्या लोक अदालतीचे उद्घाटन करण्यात आले. मांडवा सागरी पोलिस ठाणे हद्दीत फिरते लोक न्यायालय पोहोचणार असून, तेथे ग्रामपंचायत क्षेत्रातील प्रलंबित दिवाणी, फौजदारी प्रकरणे व पोलीस ठाण्यातील वादपूर्व प्रकरणे तडजोडीसाठी ठेवण्यात येणारआहेत. हे फिरते न्यायालय जिल्ह्यातील मुरुड, रोहा, पेण, पनवेल, कर्जत, खालापूर, पाली, माणगाव, महाड, श्रीवर्धन, पोलादपूर या तालुक्यात जाऊन कामकाज करणार आहे.

# बारमाही वाहणाऱ्या कुंडलिका नदीच्या तीरावरील गावांना पिण्याच्या पाण्याचा प्रश्न

**रोहे : प्रतिनिधी**



स्वच्छ व निर्मळ बारमाही वाहणारी कुंडलिका नदी रोहा तालुक्यात असताना या कुंडलिका नदीच्या किनाऱ्यावरील असणाऱ्या गावांना मात्र पाण्याचा प्रश्न कायम भेडसावत आहे. चांगला पाऊस मुबलक पाणी असतानाही रोहा तालुक्यात पाण्याचे नियोजन होताना दिसत नाही. त्यामुळे उन्हाळ्यात काही गावांना पाणीटंचाईला सामोरे जावे लागत आहे ही गावे नेहमीचीच असतात. नेहमीचच आराखडा तयार केला जातो, परंतु त्यावर कोणतेही उपाययोजना करण्यात येत नाही.

कुंडलिका नदी किनारी असलेल्या पडम, खारापटी, निडी, कोपरे, भातसई, झोळांबे, शेणवई, डोंगरी वावेखार, वावेपोटगे, यशवंत खार सानेगाव दापोली करंजविरा या गावांना उन्हाळ्यात पाणी प्रश्नला सामोरे जावे लागते. महत्त्वाचे म्हणजे या गावांसाठी २६ गाव पाणी पुरवठा योजना तयार करण्यात आले. सुरुवातीला योजनेचे पाणी गावापर्यंत पोहोचत होते. परंतु आता पोहोचत नाही. आता दुसरी योजना या गावासाठी चालू आहे. या गावांसाठी अनेक योजना तयार करण्यात आल्या आहेत. करण्यात येत आहेत. परंतु नियोजन नसल्यामुळे पाण्याचा प्रश्न हा उन्हाळ्यात भेडसावत असतो.

अनेकदा तक्रारी बैठका तहसील, प्रांत, जिल्हाधिकारी कार्यालयात झाल्या आहेत. नुकताच महिलांनी या संबंधित मोर्चा तहसील, एमआयडीसी कार्यालयावर काढून निवेदन ही देण्यात आले होते. परंतु कोणताही फरक पडल्याचे दिसून येत नाही. महत्त्वाचे म्हणजे प्रत्येक कार्यालय दुसऱ्या कार्यालयाकडे बोट दाखवताना दिसत आहे. यातील काही गावे पेण विधानसभा मतदारसंघात आहेत. तर काही गावे अलिबाग विधानसभा मतदारसंघात आहे

मोठ्या प्रमाणात पडणारा पाऊस, बारमाही वाहणारी कुंडलिका नदी हे चित्र रोहा तालुक्यात वर्षोनुवर्षे दिसत असताना असंख्य पाणी पुरवठा योजना रोहा तालुक्यात झाल्या. काही सुसिस्थीत चालू आहेत. काही अर्ध मेले झाले आहेत. काही योजना राजकीय आश्वासनात अडकले आहेत. या योजनेच्या स्थितीबाबत मात्र माहिती घेतली जात नसून नव्याने योजना तालुक्यात येताना दिसत आहेत.

रोहा तालुका औद्योगिक क्षेत्र येण्याआधी पाण्यासाठी सुजलम सुफलम होता. बारमाही वाहणाऱ्या कुंडलिकी नदी व आंबा नदी मधून तालुक्यातील गावांना पाणीपुरवठा होत असत. या गावातील विहिरी तलाव हे पाण्याचे जिवंत स्तोत्र होते. औद्योगिक रासायनिक कारखान्यामुळे नंतर कुंडलिका नदीचे व अन्य पाण्याचे स्तोत्र दूषित झाल्याने नागरिकांना पाण्यासाठी पर्यायी मार्ग स्वीकारावा लागला तर दुसरीकडे नैसर्गिक जलस्त्रोत जतन केंद्र धाटाव औद्योगिक क्षेत्रातील कारखान्याच्या सांडपाण्यामुळे कुंडलिका नदीत दूषित झाले उन्हाळ्यात या संबंधित गावांना पाण्याबाबत प्रश्नचिन्ह निर्माण होत असतो.

पान १ वरुन

## नद्यांच्या प्रदूषणाचा प्रश्न विधीमंडळात

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत सामूहिक सांडपाणी यंत्रणेची वेळोवेळी पाहणी करण्यात येते व सामूहिक सांडपाणी यंत्रणेमध्ये त्रुटी आढळून आल्यास संबंधितांना कारणे दाखवा नोटीस तसेच प्रस्तावित निर्देश बजावण्यात येतात. ठाणे जिल्ह्यातील औद्योगिक वसाहतीमधील मोठ्या व मध्यम स्वरूपाच्या उद्योगांनी औद्योगिक सांडपाणी प्रक्रिया संयंत्रणा उभारली असून प्रक्रियाकृत औद्योगिक सांडपाणी राष्ट्रीय समुद्र विज्ञान संस्थेमार्फत निर्देशितस्थळी विसर्ग करण्यात येते तसेच महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत बेकायदेशीर जीन्स वॉश उद्योगांवर नियमानुसार वेळोवेळी कारवाई करण्यात येते. कृषी विभाग तसेच मत्स्यव्यवसाय विभागाच्या अहवालात प्रश्नाधीन विषयास अनुसरून कोणतीही तक्रार प्राप्त झाली नसल्याचे नमूद करण्यात आल्याची माहिती मंत्री पंकजा मुंडे यांनी दिली आहे.

मत्स्यव्यवसाय विभागाकडून प्राप्त अहवालानुसार धरमतर खाडीतील मच्छीमारांच्या समस्या तसेच सागरी किनारपट्टीवरील प्रदूषणामुळे मत्स्योत्पादनावर होणाऱ्या परिणामाचा अभ्यास करण्यासाठी २१ फेब्रुवारी २०१९ रोजीच्या शासन निर्णयानुसार दहा सदस्यीय समिती गठीत करण्यात आली असून या समितीच्या अद्यापपर्यंत एकूण १० बैठका पार पडल्या आहेत. समितीमार्फत धरमतर खाडीची पाहणी करून धरमतर खाडीतील मच्छीमारांची माहिती संकलित करण्याची कार्यवाही सुरू आहे. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे नदी प्रदूषणाविषयी प्राप्त तक्रारींच्या अनुषंगाने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत पाहणी करण्यात येते व नियमानुसार वेळोवेळी आवश्यक ती कारवाई करण्यात येते, असेही मंत्री पंकजा मुंडे यांनी दिलेल्या लेखी उत्तरात म्हटले आहे.

## राज्य परिवहन महामंडळातील कर्मचाऱ्यांच्या प्रश्नांबाबतही वेधले शासनाचे लक्ष

मा. औद्योगिक न्यायालयातील याचिकेत आदेशित केल्यानुसार राज्य परिवहन महामंडळाला वेतन प्रदान अधिनियम १९३६ लागू होत असल्यामुळे त्यामधील प्रावधान अन्वये दरमहा १० तारखेपर्यंत वेतन अदा करता येते असे त्यामध्ये नमूद असून त्यानुसार वेतन अदा करण्यात येते. राज्य शासनाने गठीत केलेल्या त्रिसदस्यीय समितीच्या अहवालानुसार महागाई भत्याच्या थकबाकीबाबत महामंडळाची आर्थिक स्थिती सुधारल्यानंतर सदर थकबाकीबाबत महामंडळाने निर्णय घेण्याचे समितीने निर्देश दिले आहेत. त्यानुसार राज्य परिवहन महामंडळाची आर्थिक स्थिती सुधारल्यानंतर राज्य परिवहन महामंडळ स्तरावर योग्य तो निर्णय घेण्यात येईल, अशी मंत्री प्रताप सरनाईक यांनी माहिती दिली.

राज्य परिवहन महामंडळाने २६४० स्वमालकीची नवीन तयार बसेस महामंडळाच्या वाहन ताफ्यात जमा करण्याचे ठरविले असून मार्च २०२५पर्यंत प्राप्त होणाऱ्या ५०० वाहनांपैकी २०४ वाहने प्राप्त झालेली असून विभागांना वाटप करण्यात आलेली आहेत. एसटी कर्मचाऱ्यांचे, अधिकाऱ्यांचे पीएफ आणि ग्रॅज्युएटीची रक्कम, भविष्य निर्वाह निधी विश्वस्त मंडळास व उपदान निधी विश्वस्त मंडळास २२१४.४७ कोटी अदा करणे बाकी आहे. त्यामुळे कर्मचाऱ्यांना हक्काची रक्कम काढण्यास अडचणी निर्माण होत असल्याची बाब खरी आहे. कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित मागण्यांसदर्भात वेळोवेळी लोकप्रतिनिधींनी, कर्मचारी व अधिकाऱ्यांनी, विविध संघटनांनी निवेदन दिली असून प्राप्त निवेदनांच्या अनुषंगाने एसटी कर्मचाऱ्यांच्या मागण्यांसदर्भात बैठका घेण्यात आलेल्या आहेत. बैठकीमध्ये तत्कालीन मा. मुख्यमंत्री महोदयांनी दिलेल्या निर्देशानुसार १ एप्रिल २०२० रोजीच्या मूळ वेतनामध्ये ६५०० रुपयांची वाढ करून वेतन निश्चिती केलेली आहे तसेच ४ ऑक्टोबर २०२३ रोजीच्या गठीत करण्यात आलेल्या त्रिसदस्यीय समितीने सादर केलेल्या अहवालानुसार रापमची आर्थिक स्थिती सुधारल्यानंतर शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे महागाई भत्ता, घरभाडे भत्ता व वार्षिक वेतन वाढीचा दर इतरच्या फरकाची रक्कम अदा करण्याबाबत राज्य परिवहन महामंडळ स्तरावर निर्णय घेण्यात येईल, असेही मंत्री प्रताप सरनाईक यांनी लेखी उत्तरात सांगितले आहे.

# विकास भोईर यांची निवड

**उरण : बातमीदार**



कराटे क्षेत्रात भरीव व उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल उरण तालुक्यातील नवघर गावचे सुपुत्र तथा विजय विकास सामाजिक संस्थेचे उपाध्यक्ष विकास भोईर यांची शातोकान कराटे असोसिएशन ऑफ इंडिया च्या महाराष्ट्र राज्याच्या अध्यक्ष पदी निवड करण्यात आली आहे. तसे नियुक्ती पत्र संघटनेचे जनरल सेक्रेटरी बिष्णूप्रसाद शर्मा यांनी विकास भोईर यांना दिले आहे.

विजय विकास सामाजिक संस्था सेल्फ डिफेन्स कराटे ऑल स्टाईल कराटे कन्सस्ट्रॅक्टर असोसिएशन या अकॅडेमीच्या माध्यमातून विकास भोईर यांनी आजपर्यंत अनेक कराटे स्पर्धा भरविल्या आहेत. अकॅडेमीच्या माध्यमातून अनेक राज्यस्तरीय व राष्ट्रीय खेळाडू, कराटे पटू तयार झाले आहेत.गुणिजन, उत्तम कराटे पटू घडविण्यात या अकॅडमीचा मोलाचा वाटा आहे. त्यामुळे विकास भोईर यांच्या कार्याची दखल घेत त्यांची शातोकान कराटे असोसिएशन ऑफ इंडिया च्या महाराष्ट्र राज्याच्या अध्यक्ष पदी निवड करण्यात आली आहे.

या निवडीचे सर्वच स्तरातून स्वागत करण्यात येत असून विविध क्षेत्रातील मान्यवरांनी विकास भोईर यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी त्यांना शुभेच्छा दिल्या आहेत.

**दुखवटा**

## शीला पाटील



**पनवेल :** शिवसेना (उबाठा) पक्षाचे जिल्हाप्रमुख शिरीष घरत यांची बहीण शीला (बेबीताई) पद्माकर पाटील यांचे नुकतेच निधन झाले. त्यांचा दशक्रिया विधी तीर्थक्षेत्र नाशिक येथे दि. १० मार्च रोजी होणार आहे व त्यांचे उत्तर कार्य (अकरावे) राहत्या घरी बेलपाडा खारघर दि. ११ मार्च रोजी होणार आहे.

## निवडक

### लग्नाच्या आमिषाने महिलेवर अत्याचार

**पनवेल :** महिलेवर अत्याचार केल्याप्रकरणी पनवेल तालुका पोलीस ठाण्यात २४ वर्षीय तरुणाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेतील २३ वर्षीय पीडित महिलेचे लग्न झाले असून, ती पनवेल तालुक्यात राहते. या महिलेसोबत २४ वर्षीय तरुणाने सुरुवातीला मैत्रीचे संबंध निर्माण करून तिला तिच्या पतीला सोडून दे, मी तुझ्याशी लग्न करतो, असे सांगितले. त्यानंतर तिच्यावर बलात्कार केला, मात्र तो लग्न करीत नसल्याने महिलेने याप्रकरणी पनवेल तालुका पोलीस ठाण्यात या तरुणाविरोधात तक्रार दाखल केली. त्यानुसार पोलिसांनी त्याच्याविरोधात गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस करीत आहेत.

### चार वाहने धडकून अपघात

**पनवेल :** पनवेलहून मुंबईच्या दिशेने जाणार्या कारचालकाने अचानक ब्रेक दाबल्याने पाठीमागून येणाऱ्या कार एकमेकांवर धडकल्याची घटना घडली. सायन-पनवेल मार्गावरील कामोठे येथील उड्डाणपुलावर झालेल्या या अपघातात कुणीही जखमी झाले नाही. या अपघातातील टी परमिट वॅगनार कार मुंबईच्या दिशेने जात होती. ही कार कामोठे उड्डाणपुलावर आली असताना, चालकाने अचानक ब्रेक दाबून कार थांबवली. त्यामुळे त्याच्या पाठीमागून भरधाव वेगाने येणारी होंडा सिटी कार त्याच्यावर धडकली. त्यानंतर त्या कारवर त्याच्या पाठीमागून येणारी इतर दोन गाड्या एकमेकांवर धडकल्या. या चारही वाहनांचे नुकसान झाले. या अपघातामुळे चारही वाहने रस्त्यात अडकून पडल्याने सायन-पनवेल मार्गावर काही काळ वाहनांच्या रांगा लागल्या होत्या. या अपघाताची माहिती मिळताच कळंबोली वाहतूक पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन प्रथम अपघातग्रस्त वाहने बाजुला काढून वाहतुक सुरळीत केली.

### नापास झाल्यानंतर विद्यार्थी बेपत्ता

**पनवेल :** अकरावीच्या परीक्षेत तीन विषयांत नापास झाल्याने वडील ओरडल्याने एक विद्यार्थी घर सोडून गेला. हा विद्यार्थी बेपत्ता झाल्याची तक्रार खारघर पोलीस ठाण्यात नोंदविण्यात आली. पोलीस संबंधित विद्यार्थ्याच्या शोध घेत आहेत. खारघर उपनगरातील सेक्टर १८ येथील श्रीजी सोसायटीमध्ये हा विद्यार्थी राहतो. अकरावीच्या परीक्षेत तो नापास झाला होता. त्याला वडील ओरडले. त्यानंतरतो रात्री दीड वाजता घर सोडून निघून गेला. सर्वत्र शोधाशोध केल्यावर त्याच्या वडिलांनी तो बेपत्ता असल्याची तक्रार पोलिसांना दिली.

# सराईत गुन्हेगार जेरबंद; साथीदार पसार

**पनवेल : वार्ताहर**

घरफोड्यांसह इतर अनेक गुन्हे ज्यांच्या नावावर असलेल्या एका टोळीतील सराईत गुन्हेगाराला गुन्हे शाखा कक्ष २ पनवेलच्या पथकाने पाठलाग करून पकडले. त्याचे इतर साथीदार पसार झाले आहेत.

पनवेल परिसरात घरफोडी व अन्य काही गुन्ह्यातील काही संशयित आरोपी दरोडा टाकण्याच्या उद्देशाने वाशीत असल्याची माहिती गुन्हे शाखा परिमंडळ दोनच्या युनिटला मिळाली. या माहितीच्या आधारावर वरिष्ठ पोलीस निरीक्षक उमेश गवळी यांच्या नेतृत्वाखाली पोलिसांच्या पथक वाशीतील मिनी सी शोर परिसरात दाखल झाले. संशयित एका गाडीत असल्याचे समजताच या गाडीचा पाठलाग पोलिसांनी सुरू केला.

पोलिसांची चाहूल लागताच या संशयितांनी गाडी सागर विहारकडे वळवली, मात्र रस्ता माहिती नसल्याने सेक्टर ८ येथील नर्सरीकडे वळवली, जिथे पुढे रस्ता बंद आहे. नेमके त्याच्या गाडीच्या स्टेअरिंग रॉड तुटल्याने गाडी एका ठिकाणी आदळली. त्यांना पोलिसांनी शरण येण्यास सांगितले, परंतु त्यांनी त्यांची तवेरा गाडी पोलीस पथकाच्या अंगावरुन घालून त्यांना जीवे ठार मारण्याचा प्रयत्न केला. त्याचप्रमाणे त्या भागातील इतर दोन खाजगी वाहनांना धडक मारून त्या गाड्यांचे नुकसान केले व त्या संशयितांनी येथील गर्द कांदळवनाचा आधार घेत पळून गेले, मात्र पोलिसांनी थेट जंगलात घुसून शोध मोहीम सुरू केली. यासाठी ड्रोन कॅमेराचे साहाय्य घेण्यात आले, मात्र गर्द झाडी आणि ड्रोन कॅमेराच्या सीमा असल्याने फारसे हाती लागले नाही. तसेच घटनास्थळी श्वान पथक दाखल झाले होते. व त्यांनी या टोळीतील सराईत गुन्हेगार परमजित पोमण सिंग उर्फ नागेश नागराज (४३ रा.पंजाब) याला ताब्यात घेतले असून त्याच्यावर पंजाबसह डायघर पोलीस ठाणे, पार्क साईट पोलीस ठाणे मुंबई सायन पोलीस ठाणे, आर.ए.के.मार्ग पोलीस ठाणे मुंबई, जलालाबाद पोलीस ठाणे आदी ठिकाणी गुन्हे दाखल आहेत.

त्याचे सहकारी सरदार, नेपाली थापा, हसन, नेपाली व हसन याचा मित्र अशा एकूण पाच जणांचा शोध सुरू केला आहे. दरम्यान या गुन्ह्यात वापरणारी लाल रंगाची तवेरा गाडी तसेच गाडीमध्ये स्क्रु ड्रायव्हर, पक्कड, कटावणी, लोखंडी रॉड, हायड्रोलिक कटर, रस्सी बंडल, गोणपाटाच्या गोणी, मोठ्या पिशव्या, हॅण्डग्लोज, कैचीचे पाते, तीन मिरची पुडची पाकीटे असे साहित्य हस्तगत करण्यात आले आहे.

## चिपळे गावात विठ्ठल रखुमाई उत्सव



मान्यवरांची उपस्थिती





**पनवेल : रामप्रहर वृत्त**

चिपळे ग्रामस्थांच्या वतीने श्री विठ्ठल रखुमाई उत्सव सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. या सोहळ्याला आमदार प्रशांत ठाकूर यांनी उपस्थित राहून दर्शन घेतले तसेच आयोजित धार्मिक कार्यक्रमांमध्ये सहभागी होऊन शुभेच्छा दिल्या.

या वेळी भाजप तालुका भाजप उपाध्यक्ष संजय पाटील, नेरे जिल्हा परिषद अध्यक्ष सुनील पाटील, भाजप युवा मोर्चा तालुका सरचिटणीस विश्वजीत पाटील, भाजप चिपळे अध्यक्ष समीर पाटील, वासुदेव फडके, ह.भ.प तुकाराम पाटील, शशिकांत फडके, सुभाष पाटील, विठ्ठल पाटील, एकनाथ पाटील, जयेंद्र पाटील, दिनकर पाटील, महेंद्र पाटील, रोहित पाटील, समीर पद्माकर पाटील, प्रतीक पाटील, किरण पाटील, जिज्ञेश पाटील, विघ्नेश पाटील, अजित म्हात्रे, मयूरेश पाटील, तन्मय पाटील व ग्रामस्थ उपस्थित होते.

## स्मार्ट इनोव्हेशन चॅलेंजमध्ये केटीआय संस्थेचे सुयश

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

विवेकानंद एज्युकेशन सोसायटीच्या बिजनेस स्कूलतर्फे स्मार्ट इनोव्हेशन चॅलेंज भरवण्यात आले होते. या स्पर्धेत नामांकित कॉलेजेसनी सहभाग घेतला होता. याचबरोबर कोहिनुर टेक्निकल इन्स्टिट्यूट (केटीआय) संस्थेच्या विविध शाखांमधूनदेखील या स्मार्ट इनोव्हेशन चॅलेंजसाठी उत्स्फूर्तपणे सहभाग घेऊन विद्यार्थ्यांनी स्वतः बनवलेले प्रोजेक्ट्स ठेवण्यात आले होते.

या स्पर्धेमधून केटीआयच्या पनवेल शाखेतील मोशन सेन्सर या प्रोजेक्टला प्रथम क्रमांक मिळाला व केटीआय ठाणे शाखेतील टेक ट्रेसर प्रोजेक्ट ला द्वितीय क्रमांक मिळाला तसेच दादर शाखेतील फूटस्टेप पॉवर जनरेटर या प्रोजेक्टला तृतीय क्रमांक मिळाला. उत्तम सादरीकरण व नाविन्यता याचा विचार करून प्रोजेक्टची निवड करण्यात आली. प्रोजेक्टमध्ये प्राविण्य मिळवण्याचे कोहिनूर टेक्निकल संस्थेचे हे सलग तिसरे वर्ष असून हॅटट्रिक विक्रम म्हणून नाव मिळवले आहे.

सर्व कॉलेजेस मधून केटीआयच्या शाखांना प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक मिळाल्यामुळे विद्यार्थी आणि पालकांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे व या स्पर्धेच्या युगामध्ये अशा प्रकारचे यश संपादन करणे खरोखरच कौतुकास्पद आहे, अशा शब्दात पालकांनी मनोगत व्यक्त करून केटीआय संस्थेचे आभार मानले.




## बीएमएसच्या राष्ट्रीय महामंत्रीपदी सुरेश पाटील, कोषाध्यक्षपदी सुधीर घरत

**उरण : रामप्रहर वृत्त**

भारतीय मजदूर महासंघाचे (बीएमएस) त्रिवार्षिक राष्टीय अधिवेशन १ व २ मार्च रोजी पारादीप, ओरिसा येथे झाले. या अधिवेशनात नवीन कार्यकारिणीची निवड करण्यात आली. या ११ सदस्यांच्या नूतन कार्यकारिणीमध्ये सुरेश पाटील यांची राष्ट्रीय महामंत्री म्हणून तसेच सुधीर घरत यांची राष्ट्रीय कोषाध्यक्ष म्हणून फेरनिवड झाली.



भारतीय मजदूर महासंघाचे राष्ट्रीय महामंत्री रवींद्र हिमते यांच्या हस्ते उद्‌घाटन झाले. या उद्‌घाटन सत्राचे अध्यक्ष पारादीप पोर्टचे चेअरमन पी.एल.हरिनाथ हे होते, त्यांनी मनोगतात सांगितले की, बीएमएसची कामगारांच्या हक्का साठी लढणारी आणि उद्योग व राष्ट्र उभारणीत योगदान देणारी महत्वाची संघटना आहे. सुरुवातीस ध्वजारोहण करून रविंद्र हिमते यांच्या हस्ते मान्यवरांचे स्वागत होऊन अधिवेशनाच्या कामकाजास सुरूवात झाली. दोन दिवसातील ११ सत्रामध्ये विविध विषयावर चर्चा होऊन अनेक महत्वाचे ठराव मंजूर केले गेले. शासनाच्या खाजगीकरण, कंत्राटीकरण या कामगार विरोधी धोरणास कडाडून विरोध केला गेला. कंत्राटी कामगारांचे वेतन, आरोग्य विमा, सुरक्षा हे प्रश्न शासनाने तातडीने सोडवावेत, समान काम समान वेतन हे धोरण राबवावे.

राष्ट्रीय अध्यक्ष म्हणून श्रीकांत राय यांची निवड झाली. सर्व नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन रवींद्र हिमते यांनी केले. या अधिवेशनात प्रभारी चंद्रकांत अण्णा धुमाळ, सह प्रभारी मा.व्ही.एम. चावडा, महामंत्री सुरेश पाटील, कोषाध्यक्ष सुधीर घरत, ओडिशाचे अध्यक्ष पांड्याजी, पारादीप पोर्टचे विश्वस्त श्रीकांत राय, मा.राकेश पटनायक, अंजली पटेल तसेच देशातील सर्व पोर्टचे बीएमएस कार्यकारिणीचे २०० मेंबर आणि मोठा कामगार वर्ग उपस्थित होता.

## पनवेल मनपातर्फे थकबाकीदारांच्या मालमत्ता अटकावणी मोहिमेस वेग

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महापालिकेच्या वतीने थकबाकीदारांच्या मालमत्ता अटकावणी मोहीमेस जोमाने सुरूवात केली आहे. मार्च महिना सुरू झाल्यापासून गेल्या तीन दिवसामध्ये १२ मालमत्तांवर अटकावणीची कारवाई करण्यात आली आहे. आयुक्त मंगेश चितळे यांच्या आदेशानूसार उपायुक्त स्वरूप खारगे यांच्या मार्गदर्शनात महापालिकेच्यावतीने मालमत्ता कर न भरणाऱ्या थकबाकीदारांविरोधोत पनवेल महापालिकेच्या मालमत्ता कर संकलन व कर आकारणी विभागाच्यावतीने तयार करण्यात आलेल्या विविध जप्ती व अटकावणी पथकाच्या माध्यमातून वेगाने कारवाई केली जात असून, दररोज कोटीच्या घरामध्ये मालमत्ता कर पालिकेच्या तिजोरीत जमा होत आहे.



आयुक्तांनी दिलेल्या आदेशनूसार ३ मार्च रोजी मालमत्ता कर न भरणाऱ्या थकबाकीदारांवरती प्रत्येक विभागातील वसुली पथकाने कारवाई केली असून यामध्ये खारघर पथकाने गुडवील इन्फीनीटी सोसायटीच्या तीन मालमत्तांवरील थकीत कराच्या कारवाई अंतर्गत सोसायटीच्या कार्यालयावर देखील अटकावणी कारवाई करण्यात आली आहे. तसेच जोत्सना प्राईम फिटनेस वरतीदेखील अटकावणी कारवाई करण्यात आली. तसेच कामोठे पथकाने अटकावणी एस. एम. हाडे पाटील मालमत्तेवर अटकावणी कारवाई केली.

याबरोबरच कळंबोली पथकाने मार्बल मार्केट जे. बी. मार्बल प्लॉट नंबर ३४,३५,३६ कंपनी, मार्बल मार्केट नारायण रावरिया प्लॉट ११८ यांच्यावरती अटकवणी करण्यात आली. तळोजे एमआयडीसी पथकाच्या वतीने भारत कोच बिल्डर्स प्रा ली प्लॉट.उ २८ यांच्यावर आटकवणी केली.

कर अधिक्षक महेश गायकवाड तसेच कर अधिक्षक सुनील भोईर यांच्या नेतृत्वाखाली जप्ती कारवाई व वसुली कारवाईसाठी मनुष्यबळ वाढविण्यात आले आहे. वसुली कारवाईला गती देण्यासाठी य वसुली टिममध्ये वाढ करण्यात आली आहे. अटकावणी कारवाई अधिक तीव्र केल्यामुळे मालमत्ता कर भरण्याकडे मालमत्ताधारकांचाकल वाढू लागला आहे. जानेवारी महिन्यात महापालिकेने २७ मालमत्तांवर अटकावणी कारवाई केली तर फेब्रुवारी महिन्यात २१ मालमत्तांवर अटकावणी कारवाई करण्यात आली, परंतू अटकावणी केलेल्या मालमत्तांधारकानी आपला अधिकांश मालमत्ता कर भरल्याने यांच्यावरील कारवाई रद्द करण्यात आली आहे.

> **मालमत्ता कर न भरल्यास त्याच्या शास्तीमध्ये प्रतिमहा २ टक्क्यांची वाढ होत असल्याने तसेच नागरिकांनी आपला मालमत्ता कर भरून महापालिकेस सहकार्य करावे.**
> **स्वरूप खारगे, उपायुक्त, पनवेल महानगरपालिका**

महापालिकेने मालमत्ता कर ऑनलाईन भरण्यासाठी 'PMC TAX APP' मोबाईल प विकसित केले आहे. तसेच www. panvelmc.org या वेबसाईटवरती जाऊनही आपला मालमत्ता कर नागरिकांना भरता येणार आहे. मालमत्ताधारकांना काही शंका असल्यास १८००-५३२०-३४० या टोल फ्री क्रमांवरती संपर्क साधावा, असे आवाहन महापालिकेच्यावतीने करण्यात आले आहे.

## बहिणाबाई आधुनिक संत होत्या -साधना जोशी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

बहिणाबाई या आधुनिक संत होत्या. पोथ्या पुराण्यातील देवाला माणसात आणण्याचे महान कार्य निसर्ग कन्या बहिणाबाई यांनी केले, असे भावपूर्ण उद्गार ज्येष्ठ व्याख्यात्या साधना योगेश जोशी यांनी केले.

आचार्य अत्रे कट्टा व सिटिझन्स (युनिटी फोरम यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित कार्यक्रमात नवीन पनवेल येथील सिडको गार्डन मधील अत्रे कट्ट्यावरून त्या बोलत होत्या.

त्यापुढे म्हणाल्या, बहिणाबाईच्या नावातच बहिणीच्या मायेचा ओलावा, आत्मा व ईश्वर यांचा त्रिवेणी संगम आहे. बहिणाबाईंची रचना मनाच्या श्लोकांना समांतर असून कबीर, मुक्ताई, एकनाथ, तुकाराम रामदास यांच्याशी साधर्म्य आहे.

बहिणाबाईंनी ओव्याच्या द्वारे हे आध्यात्म सोप्या शब्दात आणण्याचा उल्लेख त्यांनी केला. 'सुगरणीचे घरटे' या कवितेतून बहिणाबाईंनी कर्माचा सिद्धांत सांगितला आहे. तसेच कशाले काय म्हणू नये' या कवितेत दृष्टांताची मालिका असल्याचे त्यांनी कथन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक आचार्य अत्रे कट्ट्याचे कर्पे काका यांनी केले. वक्त्याचे स्वागत संध्या कोडे यांच्या हस्ते करण्यात आले. आभार संगीता थोरात यांनी मानले. कफचे मनोहर लिमये, दातार ताकमोगे दाम्पत्य आदी उपस्थित होते.





**खारघर : कच्छ कडवा पाटीदार समाज खारघर आणि कडवा पाटीदार युवक मंडळ खारघर यांच्या वतीने खारघर हे दारूमुक्त शहर व्हावे व कोणत्याही हॉटेलमध्ये दारू पिण्यास परवानगी देऊ नये, असे निवेदन वरिष्ठ पोलीस निरीक्षक खारघर यांना देण्यात आले. या वेळी भाजप जिल्हा चिटणीस ब्रिजेश पटेल यांच्यासह कडवा पाटीदार समाजाचे नागरिक उपस्थित होते.**

## खारघरमधील हुक्का पार्लरवर गुन्हा दाखल

**पनवेल :** खारघर उपनगरातील सेक्टर ८ येथील गुडविल सोसायटीमध्ये हुक्कापार्लर चालविणार्यांवर पोलिसांनी गुन्हा नोंदविला आहे. याबाबत नवी मुंबई पोलीस दलाच्या अमली पदार्थ विरोधी कक्षाने तीन जणांवर कारवाई केल्याची माहिती पोलिसांनी दिली.

राज्यात हुक्का फ्लेवर बाळगणे तसेच हुक्का ओढाण्याचा व्यवसायाला प्रतिबंध असताना सुद्धा खारघर येथील गुडविल सोसायटीमधील गाळा क्रमांक ७ए आणि ८ ए येथे वाईब्स कॅफे या दुकानात हुक्का पार्लरचा व्यवसाय सुरू असल्याची माहिती गुन्हे अन्वेषण विभागाच्या अमली पदार्थ विरोधी कक्षाला मिळाली होती. या कक्षाचे प्रमुख वरिष्ठ पोलीस निरीक्षक संदीप निगडे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक निलेश धुमाळ यांच्या पथकाने वाईब्स कॅफे दुकानात शिरून ही कारवाई केली.







**पनवेल : ठाकूर इन्फ्राप्रोजेक्ट्स प्रायव्हेट लिमिटेडचे संचालक धनंजय करतुरी यांना वाढदिवसानिमित्त कंपनी स्टाफने शुभेच्छा दिल्या.**

## संपादकीय

# खंडणीखोरीचा शाप

गेल्या काही दिवसांत बीड जिल्ह्यात घडलेल्या घटनांमुळे एक भीषण विदारक वास्तव राज्यातील जनतेसमोर आले आहे. मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या क्रूर हत्येची छायाचित्रे आणि व्हिडिओफिती माध्यमांद्वारे प्रसारित झाल्यानंतर संपूर्ण महाराष्ट्र हादरून गेला. खंडणीखोरीमुळे फोफावलेल्या टोळ्यांचा अतिशय क्रूर आणि विकृत चेहरा यामुळे लोकांसमोर आला. महाराष्ट्राची कायदा आणि सुव्यवस्था अशा खंडणीखोर टोळ्यांकडून पोखरली जाऊ द्यायची नसेल तर या टोळ्यांचा पूर्णपणे सफाया करावाच लागेल.

**मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्याच्या विकासाचा महाकार्यक्रम हाती घेतला असला तरी त्याआधी त्यांना बरीच साफसफाई करावी लागणार आहे. कारण खंडणीखोरी व भ्रष्टाचाराला दूर केल्याशिवाय राज्याचा विकास वेगाने साधणे शक्य नाही. सुदैवाने मुख्यमंत्री फडणवीस यांच्याकडेच गृहखाते देखील आहे. मुख्यमंत्री फडणवीस यांनी राज्याच्या कारभाराची सूत्रे पुन्हा हाती घेतल्यानंतर वेगाने काम सुरू केले आहे. त्यासाठी त्यांनी शंभर दिवसांचा एक प्रशासकीय कार्यक्रमही आखला आहे. मंत्रालयातील गर्दी कमी करण्यासाठी जिल्हा आणि तालुका पातळीवरील प्रशासकीय आस्थापनांनी अधिक कार्यक्षमता दाखवावी. सरकारी कार्यालयांमध्ये स्वच्छता राखावी, तसेच जुन्या प्रकरणांचा तातडीने निपटारा करावा, अशांसारखे अनेक आदेश त्यांनी जारी केले आहेत. ही एक प्रकारची शुद्धीकरण मोहीमच आहे. फडणवीस यांच्या कारभाराला अजुन शंभर दिवस पूर्ण झालेले नाहीत. तरीही बरीचशी प्रकरणे व रखडलेले उपक्रम मार्गी लागले आहेत. मंत्रालयात दलालांचा सुळसुळाट त्यांना यापूर्वी देखील खटकला असेलच कारण त्या परिसरात फिरणारे दलाल काही नवे नाहीत. सरकारी कामे तोडपाणी करून मार्गी लावून देणाऱ्या दलालांच्या फौजा महाविकास आघाडीच्या काळात राजरोस हिंडत होत्या. खरे म्हणजे ही काँग्रेसी संस्कृतीची देणगीच आहे. महायुतीचे सरकार आल्यानंतरही हा प्रकार पुरेसा आटोक्यात येत नाही हे पाहून फडणवीस यांना बडगा उगारावा लागला. मंत्र्यांचे ओएसडी (ऑफिसर ऑन स्पेशल ड्युटी) आणि पीए यांच्या नेमणुकीबाबतच्या शिफारशींमधील फिक्सर्सचा उल्लेख फडणवीस यांनी जाहीरपणे केला आणि असली संशयास्पद नावे खड्यासारखी वगळली. मस्साजोग येथील हत्येच्या प्रकरणी मंत्री धनंजय मुंडे यांना जावे लागणार हे तर उघड होते. नैतिकतेच्या मुद्यावर त्यांनी आधीच राजीनामा दिला असता तर उचित झाले असते असे आजही राजकीय वर्तुळात बोलले जाते. विधिमंडळ अधिवेशन सुरू असतानाच मुख्यमंत्री फडणवीस यांनी मुंडे यांच्या राजीनाम्याची घोषणा करून एक महत्त्वाचा संदेश दिला आहे. सत्तेचे कवच लाभल्यावर कसेही वागले तरी चालते हा जो समज बळकट होत होता, तो फडणवीस यांनी एका फटक्यात दूर केला आहे. मुख्यमंत्र्यांनी सुरू केलेल्या सफाई मोहिमेचा एक भाग म्हणूनच या घडामोडींकडे पहावे लागेल. सरपंच देशमुख यांच्या हत्येच्या घटनेतील सारे तपशील बारकाईने पाहिले तर गुंड टोळ्यांच्या दहशतीची विदारक स्थिती कोणते टोक गाठू शकते याचे काळीज गोठवणारे दर्शन घडते. बीड जिल्ह्यात या टोळ्यांकडून गेला बराच काळ खंडणीचा धंदा जोरात चालू आहे. अशा प्रवृत्तींविरोधात पाऊल उचलण्यासाठी प्रबळ राजकीय इच्छाशक्तीची आवश्यकता असतेच. महाराष्ट्राच्या विकासासाठी अशा प्रकारची शुद्धीकरण मोहीम गरजेचीच आहे. समाजकंटकांवर कायद्याचा धाक बसलाच पाहिजे. अन्यथा कुठलाही विकास कार्यक्रम पूर्णत: यशस्वी होणार नाही. खंडणीखोरीच्या शापातून महाराष्ट्र लवकरात लवकर मुक्त व्हावा हीच साऱ्यांची इच्छा आहे.**

# ती फुलराणी...

आपल्या समाजात सर्व स्त्रियांविषयी आपल्या मनात असलेला आदरभाव, सम्मान व्यक्त करण्यासाठी दरवर्षी ८ मार्चला महिला दिन संपूर्ण जगभरात मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. आपल्याकडे महिलांना पुष्पगुच्छ तसेच भेटवस्तू देऊन महिला दिनाच्या शुभेच्छा दिल्या जातात. महिलांनी प्राप्त केलेल्या यश कीर्तीचा आढावा घेऊन त्यांच्या कामगिरीचे त्यांना पुरस्कार वगैरे देऊन कौतुक केले जाते. देशासाठी योगदान देणाऱ्या महिला स्वातंत्र्य सेनानींची त्यांच्या बलिदानाची आठवण केली जाते.देशाचे नाव मोठे करणाऱ्या महिलांना स्मरण केले जाते.



मागील वर्षी महिला दिनाच्या एक आठवडा आधी पनवेल रेल्वेस्थानक परिसरात तीन वर्षीय मुलीवर एका नराधमाने बलात्कार केल्याची घटना घडली. पीडित मुलगी आपल्या आईसोबत पनवेल रेल्वेस्थानकात झोपली होती. आई झोपली असल्याचा फायदा घेऊन एका नराधमाने मुलीला उचलून नेले आणि रेल्वेस्थानकाच्या शेजारी असलेल्या झाडाझुडपात तिच्यावर अत्याचार केला.पोलिसांनी तातडीने कारवाई करून आरोपीला अटक केली होती.

या वर्षी नुकताच पुण्याला स्वारगेट एसटी स्थानकावर भल्या पहाटे एका तरुणीवर अत्याचार झाला. राज्यात अनेक ठिकाणी चिमुरड्यांवर अत्याचारच्या घटना घडल्याचे दिसुन येत आहे . दोनच दिवसापूर्वी एका १३ वर्षाच्या मुलाने आपल्या ६ वर्षाच्या बहिणीचा खून केला. सगळे नातेवाइक तिचे लाड करतात म्हणून केला. रामनराघवन चित्रपटावरून प्रेरणा घेऊन आपण तिच्या डोक्यात दगड मारुन खुन केल्याचे त्याने पोलिसांना सांगितले बदलापुर मध्ये शाळेत सफाइ कर्मचार्याने लहान मुलीवर केलेल्या अत्याचाराचे प्रकरण ही गाजले जन्मदात्या बापानेच आपल्या चिमुरडीवर अत्याचार केल्याची तक्रार त्याच्या पत्नीने पोलिसात दाखल केली आहे . अशी अनेक प्रकरण सध्या समोर येते आहेत.

**खबरबात**
**नितीन देशमुख**

यामुळेच महिला दिन साजरा करी असतानाहिरवे हिरवे गार गालिचे, हरित तृणांच्या गालीचे, त्या सुंदर मालीवरती,फुलराणी ही खेळत होती स्वप्नवत वाटणारी ही बालकवींची कविता प्रत्क्षात कधी उतरणार, याची वाट पाहण्यापलीकडे आजच्या महिला दिनाचे दिवशी तिच्याकडे काहीच उरलेले नाही असे म्हणावे लागते .

स्त्रिया आज मोठ-मोठ्या पदावर काम करीत आहेत .राजकारणापासून ते भारतीय सेनेपर्यंत त्यांनी आपली मजल मारली आहे . वैयक्तिक आयुष्यात मात्र तिच्यावर असलेली स्वयंपाक घरातील अग्नी तेवत ठेवायची जबाबदारी कायम आहे. सतीची जागा हुंडाबळीने घेतली. गर्भजल परीक्षण, विनयभंग, बलात्कार अशा अनेक रुपाने स्त्रिया आजही सती जात आहेत. आजची परिस्थिती पाहाता असे वाटते की, केवळ अन्याय अत्याचाराचे मुखवटे बदलले आणि स्त्री बाबतचा पारंपरिक दृष्टिकोन, तिचा छळ, अपमान कायम राहिला. स्त्रियांच्या बाजूने असंख्य कायदे, संघटना असल्या तरी त्यांचे प्रश्न कायम आहेत. प्रेम मान्य केले तर ठीक नाही तर फुलराणीप्रमाणे जळणे आहे. म्हणजे स्त्रियांच्या बाजूने कायदे असले तरी ती वेगवेगळ्या रुपाने जळत आहे.

बेटी बचाव, बेटी पढाव हा नारा नुसता हवेत नको तर प्रत्येकाच्या अंतरंगात असणे गरजेचे आहे. या देशात घडत असलेल्या घटना पाहताना बेटी कैसे बचाएंगे हाच मोठा प्रश्न सर्वांसमोर उभा आहे. एकतर्फी प्रेम, जबरदस्तीचे प्रेम, आपल्याला न मिळालेले प्रेम, दुसर्याला देखील मिळू देणार नाही, अशा संस्कारांचा आपला देश नाही. मग का होत आहे हे सगळे? आपली संस्कृती बदलत चालली आहे का? दुसऱ्याच्या सुखात स्वतःचे सुख शोधायचे असते. हे विचार गेले कुठे?

मोबाइलच्या इंटरनेटने तर अश्लिलतेचा कळस गाठला आहे. इंटरनेटवर मैत्री करुन,आपले लग्न झालेले असतांना ते लपवणारे सधन राजकारणी व उच्च शिक्षित सखाराम बाइंडर ही समाजात दिसतात त्याच बरोबर लग्नाचे अमिष दाखवुन शारिरीक शोषण करण्याबरोबरच त्यांची अर्थिक फसवणुक करण्याच्या घटना रोज घडत आहेत. त्यामुळे आणखी किती निर्भया, फुलराणी बनवेल माहीत नाही.



शासनाचे अशा गुन्ह्यांबाबत असलेले लवचिक धोरण ही याला जवाबदार आहे. यामुळे प्रत्येक ठिकाणी पुरुषांच्या अधाशी नजरा टपलेल्या असतात. ना नात्याचा, ना वयाचा , ना माणुसकीचा विचार असतो. त्या नराधमांना हवी असते फक्त शिकार आणि म्हणून अनेक कळ्या देखील उमलण्याच्या आधीच खुडत आहेत.स्त्री ही कुणाची तरी आई, कुणाची बहीण, पत्नी, मुलगी असते. या सर्व भूमिकेतून आपल्या पुरुष असलेल्या मुलास, भावास व पतीस सांगावे लागेल. जसा आमचा राखतोस तसा आमच्यासारख्या स्त्रियांचा देखील मान राख. आता ही जबाबदारीदेखील स्त्रियांवरच आली आहे.


जागतिक महिला दिनाच्या पुर्व संध्येला लाडक्या बहिणींच्या खात्यात पैसे येणार आहेत. त्याबरोबरच महिलांचे एकत्रिकरण, सबलीकरण, आदरीकरण, आनंद, उत्साह, पारितोषिके, सन्मान, गौरव, पुरस्कार यामुळे दरवर्षी महिला दिन प्रेरणा देणारा, ऊर्जा देणारा वाटतो. मरगळलेल्या स्त्रीत्वाला एक उजाळा देण्यासाठी हा दिवस प्रेरक ठरेल. पण हे केवळ याच दिवसापुरते नसावे. आपल्या नात्यातील पुरुष वर्गाला जर स्त्रीविषयक चांगले संस्कार मिळाले तर निश्चितच हुंडाबळी, स्त्रीभ्रूणहत्या, मारहाण, पुरुषप्रधान संस्कृतीतील मुस्कटदाबी थांबण्यास निश्चितच हातभार लागेल. या महिला दिनाच्या दिवशी एक आशा करू या की फुलराणी जळणार नाही तर खुलणारी, खेळणारी होईल आणि मग त्या सुंदर मखमली वरती फुलराणी ही खेळत होती... या ओळी सार्थ ठरतील.



## बदलते तंत्रज्ञान

### तुमच्या नावावर किती सिम ॲक्टिव्ह आहेत?

आजच्या डिजिटल काळात आधार कार्ड आणि मोबाइल क्रमांक या दोन्ही गोष्टी खूप आवश्यक आहेत. आधार कार्ड बँक, नोकऱ्या, सरकारी सेवांसाठी प्रमुख ओळख आणि कागदपत्र म्हणून काम करते, तर मोबाइल फोन आपल्याला इतरांनाही कनेक्ट ठेवण्यास मदत करतो. याचबरोबर या दोन्ही गोष्टींचा एकमेकांशीसुद्धा संबंध आहे. म्हणजेच आधार कार्डचा वापर मोबाइलमधील सिम कार्ड खरेदी करण्यासाठी केला जातो. पण, या प्रक्रियेत अनेकदा फसवणूक किंवा गैरवापरसुद्धा होऊ शकतो. तर हे टाळण्यासाठी तुमच्या आधारकार्ड अंतर्गत किती सिम ॲक्टिव्ह आहेत हे जाणून घेणेसुद्धा तितकेच महत्त्वाचे आहे. दूरसंचार विभागाच्या (डॉट्) नियमांनुसार, एखादी व्यक्ती एका आधार कार्डशी जास्तीत जास्त नऊ सिम कार्ड लिंक करू शकते. ही मर्यादा ओलांडल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते. तुमच्या आधारशी किती नंबर लिंक केले आहेत याबद्दल तुम्हाला खात्रीनसल्यास, तुम्ही काही मिनिटांत ऑनलाइन तपासू शकता.




१. पहिल्यांदा टेलिकॉम ऑपरेटरच्या वेबसाइटला भेट द्या तुमच्या दूरसंचार ऑपरेटरच्या अधिकृत वेबसाइटला भेट द्या 'आधार लिंकिंग' किंवा 'व्हेरिफाय नंबर' पर्याय शोधा. तुमच्या आधार कार्डचे डिटेल्स लिहा आणि सबमिट करा. नंतर तुमच्या नोंदणीकृत मोबाइल नंबरवर एक ओटीपी मिळेल.तुमच्या आधारशी लिंक केलेल्या ॲक्टिव्ह क्रमांकांची यादी पाहण्यासाठी ओटीपी एंटर करा.

२.तुमच्या मोबाइल फोनवरून **१२१ * डायल करा. लिंक केलेले मोबाइल नंबर तपासण्यासाठी ऑन-स्क्रीन माहितीचे अनुसरण करा.याव्यतिरिक्त तुम्ही संचार साथी पोर्टल वापरून आधार कार्डशी लिंक केलेले सिमसुद्धा तपासू शकतासरकारने आधारशी लिंक केलेले मोबाइल नंबर ट्रॅक करण्यासाठी संचार साथी पोर्टल सुरू केले आहे. त्यासाठी तुम्हाला सगळ्यात आधी संचार साथी पोर्टलच्या वेबसाइटला जावे लागेल.नंतर सिटीझन सर्व्हिस सेंटवर क्लिक करा.'नो युवर मोबाइल कनेक्षन(T-FCOP)' हा पर्याय निवडा.तुमचा नोंदणीकृत मोबाइल नंबर एंटर करा आणि तुमच्या फोनवर पाठवलेला ओटीपी वापरून पडताळणी केल्यानंतर तुम्हाला तुमच्या आधारशी लिंक केलेल्या मोबाइल नंबरची यादी दिसेल.

# भारतीय गायिका गंगुबाई हनगल

गंगुबाई हनगल या हिंदुस्तानी (उत्तर भारतीय) शास्त्रीय परंपरेतील आणि किराणा घराण्याच्या गायिका होत. जवळजवळ सात दशकांच्या कारकिर्दीत ख्याल शैलीतील गाण्यांच्या सादरीकरणासाठी त्यांचे विशेष कौतुक झाले.



**निमित्त**

हंगल यांचा जन्म १३ मार्च १९१३, धारवाडमध्ये एका संगीत कुटुंबात झाला. त्यांची आई आणि आजी दोघेही कर्नाटक परंपरेतील स्थापित संगीतकार होते, जरी त्यांच्या आईलाही हिंदुस्तानी संगीतात खूप रस होता. हंगल यांनी भारतीय संगीताची मूलतत्त्वे – विशेषतः पारंपारिक सरगम किंवा स्वररचना , अक्षरे वापरून गाण्याचे तंत्र आईकडून शिकले आणि किशोरावस्थेत पोहोचण्यापूर्वीच सार्वजनिकरित्या सादरीकरण करण्यास सुरुवात केली. १३ वर्षांची असताना, हंगल यांनी धारवाडमधील हुबळी शहरातील एका संगीत अकादमीमध्ये हिंदुस्तानी परंपरेचे प्रशिक्षण घेण्यास सुरुवात केली . वयाच्या १५ व्या वर्षी त्या सद्गुणी हिंदुस्तानी गायिकेची शिष्य बनल्या.

सवाई गंधर्व, जे किराणा घराण्याचे प्रवर्तक होते त्यांनी हंगल यांना आपला शिष्य म्हणून घेतले,तेव्हा ते दुसरीकडे रहात होते . पण हंगल जेव्हा जेव्हा त्यांच्या मालमत्तेची तपासणी करण्यासाठी त्या भागात येत असत तेव्हा ते त्यांच्यासोबत अधूनमधून प्रशिक्षण घेत असत. दरम्यान, ती त्यांच्या आई आणि आणखी एक स्थानिक संगीतकार दत्तोपंत देसाई यांच्याकडे अभ्यास करत असे. गंधर्व त्यांच्या गावी परत येण्यास जवळजवळ एक दशक उलटले आणि हंगल त्यांच्यासोबत अधिक सखोलपणे काम करू शकले. १९४१मध्ये त्यांची तब्येत बिघडू लागेपर्यंत, तिने जवळजवळ दररोज गंधर्वांसोबत तीन वर्षे अभ्यास केला. पुढच्या वर्षी गंधर्वांचे निधन झाले. गुरुंसोबत तुलनेने कमी आणि तुरळक शिष्यत्व असूनही, हंगल यांच्यावर गंधर्वांचा तिच्या कलात्मकतेचा सर्वात जास्त प्रभाव होता. खरंच, तिने तिच्या संपूर्ण कारकिर्दीत त्यांच्या शैलीचे आणि अधिक व्यापकपणे, किरण घराण्याशी जवळून पालन केले.

१९३०च्या दशकाच्या मध्यात, जेव्हा तिने तिच्या जवळच्या समुदायाबाहेर रेकॉर्डिंग आणि सादरीकरण करण्यास सुरुवात केली तेव्हा हंगलची एक कलावंत म्हणून प्रतिष्ठा वाढू लागली. १९४०च्या दशकाच्या सुरुवातीला, ऑल इंडिया रेडिओवरील तिच्या प्रसारणांमुळे आणि देशभरातील संगीत कार्यक्रमांच्या व्यस्त वेळापत्रकामुळे ती हिंदुस्तानी संगीतात एक प्रसिद्ध व्यक्ती बनली होती. सुरुवातीला तिने भजन किंवा हिंदू भक्तीगीते, हलक्याफुलक्या मराठी भाषेतील गाणी आणि ठुमरी म्हणून ओळखली जाणारी अर्धशास्त्रीय गाणी गायली तसेच ख्याल शास्त्रीय गाणी. तथापि, १९४०च्या दशकाच्या मध्यापर्यंत तिने जवळजवळ पूर्णपणे ख्यालकडे लक्ष केंद्रित केले होते भारतीय शास्त्रीय संगीतातील योगदानाबद्दल, हंगल यांना अनेक सन्मान मिळाले. १९७३ मध्ये तिला संगीत नाटक अकादमी पुरस्कार मिळाला. हंगल यांना पद्मभूषण (१९७१) आणि पद्मविभूषण (२००२) हे भारताचे दोन सर्वोच्च नागरी सन्मान देण्यात आले. त्यांचा मृत्यु२१ जुलै २००९ रोजी कर्नाटक राज्यातील हुबळी येथे झाला.

## बातमीतील बात




## आरोग्य प्रहर

### झोप येण्यासाठी तुम्ही हा उपाय करत नाही ना?

प्रत्येक माणसाने सात ते आठ तास झोप घेणे अत्यंत आवश्यक आहे. सात ते आठ तासांपेक्षा कमी झोप झाल्यास त्याचा परिणाम आपल्या आरोग्यावर होत असतो. बहुतेक लोकांना रात्री चांगली झोप लागत नाही. त्यामुळे सकाळी उठल्यावर त्यांची चिडचिड होते. जे लोक नीट झोप घेत नाहीत, त्यांच्यासाठी ही खरोखरच अतिशय गंभीर समस्या आहे. कित्येकांना कधी कधी रात्री उशिरा झोप लागते. मग अपुऱ्या झोपेमुळे स्वाभाविकपणे सकाळी उठल्यावर सतत चिडचिड होत असते. त्यामुळे त्यांचे कोणत्याही कामात लक्ष लागत नाही. अशा वेळी अनेकजण झोप येण्यासाठी मेलाटोनिन घेतात. ही टॅबलेट चांगली झोप लागण्यासाठी, झोपेचे चक्र व्यवस्थित करण्याचे काम करते. मात्र, याचे जास्त प्रमाणातील सेवन शरीराचे नुकसान करु शकते



मेलाटोनिन हा एक संप्रेरक आहे, जो झोपेचे मुख्य कार्य आणि जागे होण्याचे चक्र नियंत्रित करतो. जरी मेलाटोनिनची गोळी नियमितपणे झोपेमध्ये मदत करीत असली तरी त्या गोळीचा सावधगिरीने वापर केला पाहिजे. कारण- जास्त प्रमाणात सेवन केल्याने नकारात्मक परिणाम होऊ शकतात.

मेलाटोनिनच्या अत्यधिक वापरामुळे आरोग्यावर होणारे नकारात्मक परिणाम खालीलप्रमाणे :

**डोके दुखणे आणि हलकी डोकेदुखी :** अतिसेवनामुळे दोन्ही लक्षणे जाणवण्यासारखे संभाव्य दुष्परिणाम होतात.

वर्तणुकीतील बदल : वाढलेली चिंता, ताण हे सर्व जास्त डोस घेण्याचे नकारात्मक परिणाम आहेत.

**पोटाच्या समस्या :** ओटीपोटात दुखणे किंवा मळमळ होणे अपेक्षित आहे.

**झोपेच्या पद्धतींमध्ये बदल :** गंमत म्हणजे जास्त वेळ झोपण्याचा प्रयत्न करताना मेलाटोनिनचा उच्च डोस घेणे अजिबात योग्य ठरणार नाही.

डॉ. अग्रवाल यांनी सांगितले की, व्यक्तीचे वय, संवेदनशीलता यांच्या मदतीने सल्ल्यानुसार डोस घ्यावा लागतो. जास्तीत जास्त कार्यक्षमतेसाठी झोपण्याच्या ३० ते ६० मिनिटे आधी १-३ मिलिग्राम सेवन केले पाहिजे. काही वैद्यकीय परिस्थितींमध्ये ५-१० मि.ग्रॅ. वापराची आवश्यकता असू शकते; परंतु तरीही दीर्घ काळापर्यंत सेवन न करण्याचा सल्ला दिला जातो.

# प्राथमिक शिक्षकांच्या आंतर जिल्हा बदलीचा मार्ग मोकळा

## शासनाकडून वेळापत्रक जाहीर

**माणगाव : बातमीदार**

जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी यांना १० मार्च ते ६ एप्रिलपर्यंत आंतरजिल्हा बदलीच्या करावयाच्या कार्यवाहीचे वेळापत्रक शासनाकडून देण्यात आले आहे. राष्ट्रीय ओबीसी बहुजन शिक्षक महासंघाने त्याचा पाठपुरावा केला होता. त्यांनी शासनाच्या निर्णयाचे महासंघाच्या वतीने स्वागत केले आहे.

जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षकांच्या ऑनलाईन आंतर जिल्हा बदलीची सुरुवात सन २०१७ सालापासून झाली. तेव्हापासून आतापर्यंत आंतरजिल्हा बदलीचे एकूण सहा टप्पे पूर्ण झाले आहेत. शिक्षकांच्या अंतर जिल्हा बदली प्रक्रियेमधील होणारा भ्रष्टाचार व वर्षानुवर्षी लालफितीत अडकणारी प्रक्रिया ऑनलाइन बदली धोरणामुळे थांबली.. दरवर्षी माहे एप्रिल /मे महिन्यामध्ये बदली इच्छुक शिक्षकांना आपल्या स्वजिल्ह्यात बदलीने जाण्याचे वेध लागतात.वेगवेगळ्या जिल्ह्यात कार्यरत पती-पत्नी यांच्या कौटुंबिक जीवनात स्थैर्य आणण्याचे काम या आंतरजिल्हा बदलीच्या माध्यमातून होते.

विशिष्ट कालावधी पूर्ण केल्यानंतर शिक्षकांना बदलीपात्र म्हणून समजले जाते. बदलीच्या माध्यमातून विधवा, कुमारिका, घटस्फोटीत- महिला शिक्षिकांना स्व-जिल्ह्यात जाता येते. वर्षानुवर्षे इतर जिल्ह्यातील सेवा केल्यानंतर स्वजिल्ह्यात बदली हा जिव्हाळ्याचा प्रश्न असतो. परंतु आंतरजिल्हा बदलीच्या सातव्या टप्प्यात मध्यंतरीची लोकसभा व विधानसभा निवडणूक व त्या अनुषंगाने आलेली आचारसंहिता यामुळे खंड पडला होता.

यामुळे आंतरजिल्हा बदली इच्छुक शिक्षकांमध्ये थोडीशी धाकधूक पाहायला मिळाली परंतु राष्ट्रीय ओबीसी बहुजन शिक्षक महासंघाने याबाबत ग्राम विकास विभागाच्या मंत्री यांची भेट घेऊन त्यांचे ओएसडी नारायण गोरे यांना याबाबतची निवड लक्षात आणून दिली. याचबरोबर महाराष्ट्रातील विविध आमदाराचे पत्रही ग्रामविकास विभागाला प्राप्त झाले.

### करावयाची कार्यवाही व त्यासाठी कालावधी

***१) शिक्षकाची माहिती पोर्टलवर अद्यावत करणे - १० मार्चपर्यत***
***२)जि.प.ने बिंदू नामावल्या तपासून घेणे व पोर्टलवर रिक्त पदांची माहिती अपलोड करणे -११ मार्च ते १३ मार्चपर्यत.***
***३) शिक्षकांना अर्ज भरण्याची सुविधा- १४ मार्च ते २० मार्चपर्यत***
***४) अर्जाची पडताळणी- २१ मार्च ते २५ मार्चपर्यंत***
***५) न्यायालयीन प्रकरणे विभागीय आयुक्त अपील प्रकरणी तपासणी-२६ मार्च ते २७ मार्चपर्यंत***
***६) आंतरजिल्हा बदली प्रक्रिया पूर्ण करणे-२८ मार्च ते ६ एप्रिलपर्यंत***

सर्व बदली इच्छुक शिक्षकांच्या बदल्या होण्यासाठी जिल्हावार रिक्त पदांची माहिती प्रत्येक जिल्हा परिषदेने अचूक कळविणे आवश्यक आहे.त्याचबरोबर जिल्हानिहाय रोष्टर अपूर्ण असल्याने काही जिल्ह्यातील बदली प्रक्रिया पूर्ण होत नाही त्यासाठी राज्यरोष्टर हा एकमेव पर्याय संघटनेसमोर आहे.भविष्यात त्यासाठी मोठा लढा उभारावा लागणार आहे. त्याचबरोबर काही जिल्हा परिषदा बदली होऊनही सदर शिक्षकांना कार्यमुक्त करत नाहीत त्याबाबत ही ठोस धोरण शासनाने अवलंबिन्याची गरज आहे.

-अनिल नाचपले , प्रदेशाध्यक्ष
राष्ट्रीय ओबीसी बहुजन शिक्षक महासंघ महाराष्ट्र राज्य

# कर्जत स्टेशनवरील मुख्य पुलावर तीन नंबर फलाटाचा विसर

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत रेल्वे स्थानकावरील पुणे बाजुला असणाऱ्या मुख्य पुलावर लोकल गाड्यांच्या माहिती करिता फलाट क्रमांक दर्शविण्याकरिता काही वर्षांपूर्वी इंडिकाटर्स बसविले आहेत. मात्र तीन नंबर फलाटाचा कुठेही उल्लेख नाही. या फलाटाचा विसर रेल्वे प्रशासनाला पडल्याने प्रवाशांची रोजच धावपळ होत असते. तीन क्रमांक फलाटाचे इंडिकेटर बसवून प्रवाशांची सोय करावी अशी मागणी प्रवाशांकडून होत आहे.

कर्जत रेल्वे स्थानकावर लोकल गाड्या फलाट क्रमांक एक, दोन, इमयू आणि तीन क्रमांकाच्या फलाटावर लोकल गाड्या येत असतात. परंतु खोपोली गाडी करिता फलाट निश्चित नसल्याने कर्जत येथे खोपोली लोकल कधी फलाट क्रमांक दोन वर कधी एक वर तर कधी तीन वर आणली जाते. कर्जतहून खोपोलीला जाण्या करिता प्रवासी पुणे बाजुला असलेल्या पुलावर उभे राहतात जेणे करून खोपोली गाडी ज्या फलाट वर येईल तिकडे जाता येईल. या प्रकारामुळे पुलावर प्रवाशांची गर्दी होते व त्याचा त्रास अन्य प्रवाशांना होतो.

खोपोलीकडे जाणारी किंवा खोपोलीवरून मुंबईकडे जाणारी लोकल फलाट क्रमांक तीन वर येणार असली तर तसा उल्लेख नसतो कारण तीन क्रमांकाच्या फलाटासाठी पुलावर इंडिकेटरच उपलब्ध नसल्याने समोर गाडी आल्यावर प्रवाशांची एकच धावपळ होते. या धावपळीत काही जण पडतात. काहींचे सामान पुलावरच राहते. जेष्ठ नागरिक व महिलांना खूप त्रास होतो. कधी कधी गाडीही सुटते.

दररोज प्रवास करणाऱ्या दर्शना सुनील शेट्ये यांनी ही बाब निदर्शनास आणून दिली व लवकरात लवकर तीन नंबर फलाटाचा इंडिकेटर बसवावा, अशी मागणी केली आहे.




# महिला व बालविकास विभागीय उपायुक्त सुवर्णा पवार बालस्नेही पुरस्काराने सन्मानित

**पाली : प्रतिनिधी**



महाराष्ट्र राज्य महिला व बालविकास विभाग अंतर्गत बालहक्क संरक्षण आयोग यांच्यामार्फत महाराष्ट्राच्या बालकांकरीता उत्कृष्ट कार्य करणाऱ्या अधिकारी कर्मचारी यांना पुरस्कार जाहीर करण्यात आले. त्यामध्ये महीला व बाल विकास विभाग अंतर्गत सुवर्णा पवार यांना कोकण विभागातून उत्कृष्ट उपायुक्त या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. सुवर्णा पवार या साहित्यिक लेखिका कवयित्री असून त्यांची अनेक पुस्तके प्रकाशित झाली आहे.

सुवर्णा पवार या बालकांच्या क्षेत्रात अनेक वर्षापासून काम करीत असून महिला व बालविकास विभागामध्ये त्या उपायुक्त पदावर कार्यरत आहेत. त्यांनी अनाथ निराधार आणि निराश्रित बालकांसाठी उन्हाळी सुट्टीमध्ये मामाच गाव ही अभिनव कल्पना राबवून मुलांसाठी उन्हाळ्यात शिबिरे आयोजित केली होती. सदर शिबिरांमध्ये कौशल्य विकास विविध प्रकारचे खेळ विविध प्रकारच्या करमणुकीचे कार्यक्रम यांच्या माध्यमातून जी मुले पूर्ण आनाथ आहेत संस्थेमधून कधीही नातेवाईक किंवा आपल्या घरी जाऊ शकत नाहीत .त्यांना मुंबई तील चिल्ड्रन्स एड सोसायटी या संस्थांमध्ये बोलवून आजोळ सारखी मामाच्या गावा सारखी मजा करण्याची संधी उपलब्ध करून देण्यात आली होती .

राजभवनात मुलांची सहल काढून मुलांना आनंदी ठेवण्यासाठी विविध उपक्रम राबविण्यात आले होते. त्यांच्या विभागातील इतर सर्व प्रकारच्या प्रशासकीय कामाची दखल घेऊन त्यांना बालस्नेही पुरस्काराने मंत्री महिला व बालविकास विभाग आदिती तटकरे, बाल हक्क संरक्षण आयोगाच्या अध्यक्षा सुशिबेन शाह व राज्यपाल यांचे सचिव डॉ. प्रशांत नारनवरे यांच्या हस्ते पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले सदर कार्यक्रमाला मेघना बोर्डीकर साकोरे राज्य मंत्री महीला व बाल विकास विभाग महाराष्ट्र शासन, विधान परिषदेच्या सदस्या मनीषाताई कायंदे, व इतर मान्यवर उपस्थित होते.

# माणगावमधील पाणपोई आजही तहानलेलीच!

**माणगाव : बातमीदार**

माणगाव मधील जैन नवयुवक मंडळाच्या वतीने जैन संघटनांनी माणगावकरांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सोडविण्याच्या दृष्टीने काही वर्षांपूर्वी माणगाव एसटी स्टँड व साबळे हायस्कूल येथे दोन पाणपोई बांधल्या होत्या. परंतु आज रोजी बांधलेल्या दोन्हीही पाणपोई धुळ खात असल्याचे दिसते,

झाड लावणे सोपे असते परंतु त्या झाडाला वटवृक्षात रूपांतर होईपर्यंत जपावे व त्याला वाढवणे हे तितकेच जटिल आणि कष्टाचे असते. माणगाव मधील जैन समाजाने माणगावकरांना पिण्याच्या पाण्याच्या त्रासापासून दिलासा मिळावा म्हणून पाणपोई सुरु केल्या होत्या परंतु गेले कित्येक वर्षे सदरील पाणपोया बंदच दिसत आहेत तसेच त्यांच्यावर रानटी झाडांचे विळखे दिसत आहेत,

माणगावकरांची व वाटसरूंची वाढती तहान व आपले कर्तव्य याची जाणीव ठेवून पुन्हा एकदा जैन संघटना माणगावकरांच्या पाण्याच्या प्रश्न सोडवतील का किंवा पाणी दानाचे पुण्य आपल्या पदरी पाडून घेतील का? असा प्रश्न सर्व सामान्य तहानलेल्या नागरिकांनी माणगाव जैन संघटनेला केला आहे. माणगाव मधीलच नव्हे तर सर्व ठिकाणी जैन संघटना नेहमी दानधर्म करण्यात तसेच गरीब जनतेच्या हिताचे काम करण्यात अग्रेसर असलेला दिसतो, तरी पुन्हा एकदा आपणच लावलेल्या झाडाला ते पूर्ववत पाणी देतील का असा प्रश्न उद्भवतो !




## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळवीणेत येते की मौजे वांगणी तर्फे वाजे, तहसील-पनवेल, जिल्हा-रायगड, येथील खाली वर्णन करणेत आलेली शेतजमीन विद्यमान कब्जेदार श्री. नामदेव सुदाम घरत यांचेकडून आमचे अशिलानी कायम खरेदी घेणेचा व्यवहार ठरविला आहे, महसूल दप्तरी असलेले सदर शेतजमीनीचे वर्णन खालिलप्रमाणे:-

**शेतजमीनीचे वर्णन**

मौजे वांगणी तर्फे वाजे, तहसील पनवेल जिल्हा रायगड येथील
जिल्हा परीषद रायगड, पंचायत समिती पनवेल, मे. दुय्यम निबंधक पनवेल यांचे अधीकार क्षेत्रातील.

| गट क्रमांक व उपविभाग | भोगवटादार वर्ग | क्षेत्र: लावणी लायक हे. आर. प्रती | क्षेत्र: पोटखराबा हे. आर. प्रती | क्षेत्र: एकुण क्षेत्र हे. आर. प्रती | आकार रू. पै |
|---|---|---|---|---|---|
| १०४ | १ | ०-३१-६० | ०-०५-८० | ०-३७-४० | ५.६२ |

वरील शेतजमीन/ मिळकत या बाबत अन्य कोणाही व्यक्तीचा गहाण, दान, बक्षीस, साठेकरार, फरोक्त, पोटगी, वारसा वा तत्सम कोणतेही प्रकारचे दस्ताने कोणतेही प्रकारचा हक्क वा हितसंबंध असल्यास त्यांनी आपल्या लेखी हरकती प्रथम दर्शनी पुराव्या सहीत सदर नोटीस प्रसिध्द झालेपासुन १५ दिवसाचे आत पोहचतील अश्या खाली सही करणार खरेदीदाराचे वकील यांचेकडे रजिस्टर्ड पोष्टाने पाठवाव्यात. वरील मुदतीत हरकती न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजाविरहित आहे असे समजणेत येवुन सदर खरेदी व्यवहार विद्यमान मालक यांच्या बरोबर पूर्ण केला जाईल व मुदतीनंतर आलेल्या हरकती आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची स्पष्ट नोंद घ्यावी.

**ठिकाण : पनवेल**
**दिनांक : ०४/०३/२०२५**

**कार्यालयीन पत्ता**
बी. १०२, पहिला मजला, श्री दत्तराज
सोसायटी, जुने तहसिलदार ऑफिस
समोर ता. पनवेल, जिल्हा रायगड ४१०२०६

**सही/-**
**ॲड. स्वप्निल व्यं जाधव**
**बी.ए, एल.एल.बी.**
**( खरेदीदाराचे वकिल)**



MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

## E –TENDER NOTICE

**MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical contractors on Mahatransco Website https://srmetender.mahatransco.in for the following Tender** specification. **Tender fees Rs.500/- + GST**

| Sr. No. | Particulars | Description |
|---|---|---|
| 1 | Tender No. & Name of Tender | **RFxNo :- 7000035502** **Tender No.: EE/EHV(O&M)/DN/PNL/ e-Tender-43/ 2023-2024.** RFx e-tender for work of providing and fixing of 200W LED Floodlights IP 65 on existing high mast towers at various Substation under EHV (O&M) Division Panvel.. **Tender amount Rs. 31,13,699/-, EMD amount Rs. 31,137/-** |
| 2 | Online Downloading the RFx | **04.03.2025, 18:00 Hrs. to 19.03.2025, 10:59 Hrs.** |
| 3 | Online Submission of the RFx | **On or Before 19.03.2025 up to 10:59 Hrs.** |
| 4 | Online Opening of the **Techno Commercial RFx** | **19.03.2025 at 11:00 hrs.(if Possible)** |

For further details visit our website :- **https://srmetender.mahatransco.in**
**Contact Person :-** The ADDL. Executive Engineer, (O) : Phone No. 9769213818.
**Note :** All eligible Supplier/Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.

**SD/-**
**EXECUTIVE ENGINEER E.H.V.(O&M) DN. PANVEL**


# साळाव जेएसडब्लू कंपनीमध्ये राष्ट्रीय सुरक्षा दिन उत्साहात साजरा



**रेवदंडा : प्रतिनिधी**

साळाव जेएसडब्लू लि. मध्ये ५४वा राष्ट्रीय सुरक्षा दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यानिमित्ताने कंपनीच्या फायर अॅण्ड सेप्टी विभागाचे वतीने महिनाभर विविध स्पर्धा प्रकल्पातील कर्मचारी,कंत्राटी कामगार, कर्मचारी वर्गाचे कुटूंबिय, मुले यांच्या मध्ये घेण्यात आल्या. यामध्ये भिंती पत्रके, प्रश्न मंजूषा, घोष वाक्य स्पर्धा यांचा समावेश होता.

या कार्यक्रमास साळाव जेएसडब्लू कंपनी हेड पंकज मलिक, सुरक्षा प्रमुख निशांत संकाळे,वरिष्ठ अधिकारी सुनिल लोणकर, वरिष्ठअधिकारी अजीत आठवले, विरिष्ठ अधिकारी जितेंद आचार्य, साळाव जेएसडब्लू फायर अँड सेप्टी प्रंबधक योगेश वासनिक ,साळाव फायर अँड सेप्टीचे उपप्रबधंक अभिषेक कुलक्षेंत्रा आदीची उपस्थित होते.

# रायगडसाठी जिल्हाधिकाऱ्यांकडून स्थानिक सुट्ट्या जाहीर

**रायगड : रामप्रहर वृत्त**

रायगड जिल्ह्यातील महसूल हद्दीमध्ये शासनाच्या सर्व खात्यांमधील कार्यालयांकरिता ३ स्थानिक सुट्टया जाहीर करण्याचे अधिकारी जिल्हाधिकारी यांना प्रदान करण्यात आले आहेत.

त्यानुसार सन-२०२५ या वर्षाकरिता गुरुवार, दि.१३ मार्च २०२५ रोजी होळी, मंगळवार, दि.२ सप्टेंबर २०२५ ज्येष्ठा गौरी विसर्जन, सोमवार, दि.२० ऑक्टोबर २०२५ रोजी नरक चतुर्थी या तीन स्थानिक सुट्टयांची अधिसूचना जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी जारी केली आहे.


राम प्रहर
वस्तुनिष्ठ बातम्या आणि आकर्षक जाहिरातींसाठी



## कुळगांव बदलापूर नगरपरिषद

नगरपरिषद दुबे रुग्णालय इमारत, पहिला मजला, आदर्श विद्यामंदिर रोड, बदलापूर रेल्वे स्टेशन (पूर्व), कुळगांव, पिन-४२१५०३. ता. अंबरनाथ जि. ठाणे. ईमेल :- coud.kulgaonbadalapur@maharashtra.gov.in वेबसाईट :- http://kbmc.gov.in

**जा.क्र. : कुबनप/उद्यान/२३२/२०२४-२५** **दिनांक :- ०४/०३/२०२५**

**ई-निविदा सूचना- क्र०३/२०२४-२५**

कुळगांव बदलापूर नगरपरिषद हद्दीमध्ये खालील कामासाठी महाराष्ट्र शासनाकडील नोंदणीकृत/अनुभवी कंत्राटदार धारक यांचेकडून ई-टेंडरिंग पद्धतीने निविदा मागावनेत येत आहे.

| अ. क्र. पूर्ण | कामाचे नांव | कामाची अंदाजित रक्कम रु. | ई-निविदा फॉर्म फी.(ना- परतावा) वस्तू व सेवा करासहित | इसारा रक्कम रक्कम रु. | काम करण्याची मुदत पावसाळ्यासह |
|---|---|---|---|---|---|
| १. | नगरपरिषद हद्दीतील झाडाची आवश्यकतेनुसार छाटणी करणे, वारा-पावसामध्ये पडलेले झाड काढणे, धोकादायक स्वरूपाची झाडाची छाटणी करणे/काढणे, विकास कामात बाधित झाडे काढणे व तोडलेल्या/छाटलेल्या झाडे/फांद्या नगरपरिषद निर्देश देईल त्या प्रक्रिया केंद्रावर पोहोच करणे. | रु. ३०,००,०००/- | रु. ५९०/- | रु. ३०,०००/- | ३ वर्ष |

ई-निविदा फॉर्म दिनांक ०४-३-२०२५ ते दिनांक १२-३-२०२५ पर्यंत ई टेंडरिंग (E-Tendering) संगणक प्रणालीच्या संकेतस्थळावर http://mahatenders.gov.in प्राप्त होतील. निविदा फॉर्म फी व निविदा ईसारा रक्कम ऑनलाईन भरणेचे आहेत. निविदा फॉर्म ऑनलाईन उपलब्ध होईल. निविदेचे सादरीकरण दिनांक १२-३-२०२५ रोजी दुपारी ३.०० वाजेपर्यंत http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर ऑनलाईन सादर करणेचे आहे.

वरील प्रक्रियेद्वारे प्राप्त झालेल्या निविदा दिनांक १३-३-२०२५ रोजी दुपारी ४.०० वा. किंवा अन्य सोयीच्या दिवशी निश्चित होईल त्या दिवशी दालनात उपस्थित संस्थेचे प्रतिनिधी/कंत्राटदार अथवा अधिकृत प्रतिनिधी समोर उघडण्यात येतील.

यांच्यातील कोणतीही निविदा स्विकारणे अथवा नाकारण्याचा अधिकार मुख्याधिकारी, कुळगाव बदलापूर नगरपरिषद यांनी राखून ठेवला आहे.

**सही/-**
**( मारुती गायकवाड )**
**मुख्याधिकारी**
**कुळगाव बदलापूर नगरपरिषद**



## महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ

(महाराष्ट्र शासन अंगिकृत)

मुदतवाढ सूचना

ई निविदा सूचना क्र. ७९/२०२४-२०२५ (मुंबई) करीता

दिनांक १९/०२/२०२५ रोजी दैनिक मुंबई चौफेर, मुंबई, दैनिक प्रहार, मुंबई,दैनिक फ्रिप्रेस जरनल, मुंबई,दैनिक एक्टिव्ह टाईम्स, मुंबई,दैनिक मिड डे, मुंबई,दैनिक भास्कर, मुंबई,दैनिक खबरें आजतक, मुंबई,दैनिक रामप्रहर, रायगड या वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध झालेल्या वरील ई निविदा सूचनेतील खालील कामाकरीता कंत्राटदारांच्या मुद्यांचे निराकरण / महामंडळाचा खुलास व ई निविदा महामंडळाच्या संकेतस्थळावर उपलब्धतेबाबत मुदतवाढ सूचना देण्यात येत आहे.

| अ. क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम रूपये |
|---|---|---|
| १ | महाराष्ट्र राज्यातील दिघी बंदर औद्योगिक क्षेत्र, ता.माणगाव व रोहा, जिल्हा रायगड येथे होणाऱ्या हायटेक फार्मास्युटिकल पार्कचा विकास, संचलन, देखभाल आणि व्यवस्थापनासाठी बांधा, वापरा व हस्तांतरीत करणे (पीपीपी) या तत्वावर विकासकाची निवड करण्यासाठी प्रस्ताव (आरएफपी) ची विनंती. (दुसरी मागणी) | ०.०० |

उपरोक्त कामांकरीता निविदा प्रपत्र दिनांक १८/०३/२०२५ पर्यंत महामंडळाच्या http://www.midcindia.org या संकेत स्थळावर उपलब्ध असतील.

आता कंत्राटदारांच्या मुद्यांचे निराकरण /महामंडळाचा खुलासा दिनांक ११/०३/२०२५ पासून महामंडळाच्या संकेत स्थळावर उपलब्ध होईल.

ज्या निविदा धारकांनी यापूर्वी आपली निविदा भरली असेल अथवा अपलोड केली असेल, त्यांनी निविदेमध्ये बदल करुन किंवा बदल न करता सदर निविदा पुन्हा भरणे आवश्यक आहे, याची कृपया नोंद घ्यावी, अशा कंत्राटदारांनी शुद्धिपत्रकानंतर जर निविदा पुन्हा भरली नाही अथवा अपलोड केली नाही तर त्यांचा देकार सदर स्पर्धात्मक निविदेतून आपोआप बाद होईल.

सदर निविदा सूचनेत इतर कोणताही बदल करण्यात आलेला नाही.

# नवी मुंबईत महास्वच्छता अभियान



**नवी मुंबई : बातमीदार**

डॉ . श्री नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठान, रेवदंडा यांच्या वतीने महाराष्ट्रभूषण ज्येष्ठ निरूपणकार डॉ श्री नानासाहेब धर्माधिकारी यांच्या १०३ व्या जयंती दिनानिमित्त रविवारी नवी मुंबई परिसरामध्ये 'महा स्वच्छता' अभियानाचे आयोजन करण्यात आले.

नवी मुंबई हे दळणवळणाच्या दृष्टीने महत्त्वाचे शहर असून नवी मुंबईतील अनेक क्षेत्रे वर्दळीची आहेत. या रस्त्यांची नियमित स्वच्छता करण्याप्रमाणेच विशेषत्वाने महामार्ग व दुर्लक्षित ठिकाणे यांची सखोल स्वच्छता करण्याकडे महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष लक्ष देण्यात येत आहे. स्वच्छ सर्वेक्षणाच्या सुपर स्वच्छ लीग या विशेष कॅटेगरीत देशातील तीन शहरांमध्ये समाविष्ट असलेल्या नवी मुंबईचा स्वच्छ शहर हा नावलौकिक कायम रहावा यादृष्टीने महानगरपालिका नेहमीच सतर्कतेने कार्यरत असते. याच अनुषंगाने नवी मुंबई परिसरामध्ये महास्वच्छता' अभियान झाले.

या मोहीमेत व्यापक प्रमाणात लोकसहभाग लाभेल या भूमिकेतून नवी मुंबई महापालिकेच्या आठही विभागांत रस्त्यांच्या दुतर्फा स्वच्छता मोहीमेचे नियोजन करण्यात आले. स्वच्छताविषयक उपक्रमांनी प्रेरित झालेल्या ३०५० हून अधिक श्रीसदस्य नागरिकांनी नवी मुंबईतील अंतर्गत रस्त्यांची साफसफाई करुन यशस्वीरित्या मोहीम राबवली.

सकाळपासून महा स्वच्छता मोहीमेचे व्यवस्थित नियोजन करण्यात आले होते. वाशी, नेरूळ, बेलापूर, कोपरखैरणे, ऐरोली, या विभाग कार्यालयांच्या हद्दीत येणाऱ्या सर्व अंतर्गत रस्त्यांच्या स्वच्छता मोहीमेत

## ३०००हून अधिक नागरिकांचा सहभाग

डॉ. श्री नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानचे श्रीसदस्य यांना अंतर्गत रस्त्यावरील क्षेत्र वाटप करून देण्यात आले होते.

या मोहिमेत बेलापूर विभाग अंतर्गत सहा ठिकाणी १४ कि.मी क्षेत्रफळात १९३ श्रीसदस्यांनी ६४४ किलो कचरा एकत्रित केला. नेरूळ विभाग अंतर्गत तेरा ठिकाणी १६.१० कि.मी क्षेत्रफळात ८०१ श्रीसदस्यांनी ३११९ किलो कचरा एकत्रित केला. वाशी व तुर्भे विभाग अंतर्गत अठरा ठिकाणी २५.६० कि.मी क्षेत्रफळात ६०५ श्रीसदस्यांनी २६२९ किलो कचरा एकत्रित केला. कोपरखैरणे विभाग अंतर्गत १२ ठिकाणी १८.२० कि.मी क्षेत्रफळात ६९७ श्रीसदस्यांनी १६५३ किलो कचरा एकत्रित केला. घणसोली ते दिघा विभाग अंतर्गत २३ ठिकाणी ४६.१५ कि.मी क्षेत्रफळात ७५३ श्रीसदस्यांनी २९४७.५० किलो कचरा संकलित केला. अशाप्रकारे एकूण ३०४९ श्रीसदस्यांनी १०९९२.३० किलो कचरा एकत्रित करण्यात आला.

महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली, अतिरिक्त आयुक्त सुनील पवार, घनकचरा व्यवस्थापन विभागाचे परिमंडळ १ उपायुक्त डॉ अजय गडदे व परिमंडळ २ उपायुक्त संतोष वारुळे तसेच परिमंडळ १ उपायुक्त सोमनाथ पोटरे व परिमंडळ २ उपायुक्त डॉ. कैलास गायकवाड यांच्या नियंत्रणाखाली सर्व विभागांचे सहाय्यक आयुक्त तथा विभाग अधिकारी, स्वच्छता अधिकारी, स्वच्छता निरीक्षक व स्वच्छताकर्मी यांनी सहभागी होत ही विशेष स्वच्छता मोहीम यशस्वी केली.

# कर्णकर्कश आवाजाच्या सायलेन्सरवर होणार कारवाई



**नवी मुंबई : प्रतिनिधी**

कर्णकर्कश आवाजाचे सायलेन्सर लावून, वेगात वाहने चालवणाऱ्या वाहन चालकांवर वाशी वाहतूक शाखेच्या पोलिसांकडून कारवाई करण्यात आली आहे. या कारवाईमध्ये कर्णकर्कश आवाजाचे ६९ सायलेन्सर जप्त करण्यात आले आहेत, अशी माहिती वरिष्ठ पोलीस निरीक्षक दिलीप गुजर यांनी दिली. आवश्यक परवानगी घेवून लवकरच ते नष्ट करण्यात येणार आहे.

वाहतूक विभागाचे पोलीस उपआयुक्त तिरूपती काकडे यांच्या आदेशाने आणि सहा. पोलीस आयुक्त विठ्ठल कुबडे यांच्या मार्गदर्शनाखाली नवी मुंबईत या संदर्भात विशेष मोहीम राबवण्यात आली.

कर्णकर्कश आवाजाचे सायलेन्सर लावून वेगात वाहने चालवणाऱ्या वाहन चालकांविषयी ज्येष्ठ नागरिक आणि इतर लोकांनी वाहतूक शाखेकडे तक्रारी केल्या होत्या. ज्शा वाहनांवर कारवाई करण्यासाठी विशेष मोहिमेचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी नियमांचे उल्लंघन करणाऱ्या ६९ वाहन चालकांवर कारवाई करून त्यांचे सायलेन्सर जप्त करण्यात आले. यामध्ये त्यांच्याकडून ६९ हजार रुपये दंडही वसूल करण्यात आला.

तसेच दोन महागड्या कारचालकांनी त्यांच्या वाहनांमध्ये अनधिकृत पालट करून कर्णकर्कश आवाजाचे सायलेन्सर लावल्याचे आढळून आले. त्यांच्यावर मोटर परीवहन विभाग यांच्या सहाय्याने कारवाई करण्यात आली. वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्यावर अधिक प्रभावीपणे कारवाई करण्यात येणार आहे, असे गुजर यांनी सांगितले.

# पनवेल मनपाच्या तिजोरीत ३४१ कोटींहून अधिक मालमत्ता कर जमा



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

यावर्षीच्या आर्थिक वर्षामध्ये एप्रिल २०२४ महिन्यापासून ते आज दिनांक ०४ मार्च पर्यंत महापालिकेच्या तिजोरीत ३४१ कोटीहून अधिक मालमत्ता कर जमा झाला आहे. मालमत्ता कर हा महापालिकेचा एकमेव आर्थिक स्त्रोत असून आयुक्त मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली गेल्या काही महिन्यांपासून नागरिकांनी मालमत्ता लवकरात लवकर भरावा असे आवाहन करण्यात येत असून याचा सकारात्मक परिणाम दिसून येत आहे. यावर्षी महापालिकेच्या तिजोरीत ३४१ कोटीहून अधिक रूपयांची भर पडली आहे.

३१ मार्च ही मालमत्ता कर भरण्याची शेवटची तारीख असल्यामुळे व मालमत्ता कराच्या शास्तीमध्ये दरमहा दोन टक्क्यांची वाढ होत असल्याने नागरिक मोठ्या प्रमाणात आपला मालमत्ता कर भरत असून गेल्या चार दिवसापासून दररोज महापालिकेच्या तिजोरीत १ कोटीहून अधिक रक्कमेची भर पडत आहे. यामध्ये १ मार्चपासून आज दिनांक ४ मार्च पर्यंत एकुण भरणा पाच कोटी ५६ लाखांचा भरणा झाला आहे.

त्याचप्रमाणे मालमत्ताधारकांना नावामध्ये बदल करायचा असल्यास महापालिकेच्या PMC TAX APP मोबाईल अ‍ॅपच्या माध्यमातून करता येणार आहे. या पमध्ये नाव बदलाकरता रिक्वेस्ट केल्यास महापालिकेकडून नाव बदलानंतर संबधितांस नोटिफिकेशन मिळणार आहे. मालमत्ताधारकांना मालमत्ता कर ऑनलाईन भरण्यासाठी महापालिकेने PMC TAX APP विकसित केले आहे तसेच www.panvelmc.org या वेबसाईटवरती जाऊनही आपला मालमत्ता कर नागरिकांना भरता येणार आहे. या सुविधांचा लाभ घेऊन नागरिकांनी आपला मालमत्ता कर लवकरात लवकर भरावा तसेच मालमत्ताकराबाबत काही शंका असल्यास त्यांनी १८०० ५३२०३४० या टोल फ्री क्रमांकावरती संपर्क साधावा, असे आवाहन उपायुक्त स्वरूप खारगे यांनी केले आहे.

**मालमत्ता कर हा महापालिकेच्या उत्पन्नाचा महत्वाच स्त्रोत आहे. महापालिकेची विविध विकास कामे सध्या सुरू असून महापालिका कार्यक्षेत्रातील नागरिकांनी आपला थकीत मालमत्ता कर भरून महापालिकेस सहाकार्य करावे.**

**–स्वरूप खारगे, सहाय्यक आयुक्त, पनवेल महानगरपालिका**

# 'विद्याभवन'च्या विद्यार्थ्यांचे कथा अभिवाचन स्पर्धेत देदीप्यमान यश



**नवी मुंबई : बातमीदार**

मराठी भाषेची गोडी, वाचनाची अभिरुची आणि साहित्यातील गहिरेपणा नव्या पिढीपर्यंत पोहोचावा, या उद्देशाने पारिजात मुंबई संस्थेतर्फे मराठी भाषा दिनानिमित्त १ मार्च रोजी आयोजित गोष्ट मराठीची या शालेय विद्यार्थ्यांसाठीच्या सांघिक कथा अभिवाचन स्पर्धेला दादर येथील कीर्ती कॉलेजमध्ये भव्य प्रतिसाद लाभला. या स्पर्धेत बृहन्मुंबई येथील २४ शाळांमधील ९६ विद्यार्थ्यांनी आपला सहभाग नोंदवला. यात पुणे विद्यार्थी गृह विद्याभवन शैक्षणिक संकुल, नेरूळचे विद्यार्थी संघाचे चांगली कामगिरी केली.

स्पर्धेतील मोठ्या गटात (आठवी ते दहावी) कृपा शितकर, गार्गी कांबळे, आर्या नात्ती, स्वरा माळी आणि सुहानी कांबळे यांनी आपल्या प्रभावी सादरीकरणाने परीक्षकांचे मन जिंकले. त्यांच्या उत्कृष्ट अभिवाचनाच्या बळावर प्रथम क्रमांकाचे सांघिक पारितोषिक पटकावून त्यांनी विद्याभवनच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला. त्यांना सन्मानचिन्ह, प्रशस्तीपत्र आणि रोख ३००० रुपये देऊन गौरवण्यात आले.

याचप्रमाणे, लहान गटात (पाचवी ते सातवी) प्राथमिक मराठी व माध्यमिक इंग्रजी शाळेने आपली किमया दाखवत द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक पटकावले. वैदश्री राक्षे, विभूती गुंजाळ, आर्या कदम, वेदांती जाधव, गार्गी गोळे, प्रणाली कांबळे आणि भूमी शितकर यांच्या शब्दसंपदेच्या जादूने रसिक प्रेक्षक आणि परीक्षकांना मंत्रमुग्ध केले. या विजेत्यांना सन्मानचिन्ह, प्रशस्तीपत्र आणि रोख २००० रुपये देऊन सन्मानित करण्यात आले. याशिवाय, माध्यमिक मराठी गटातील (आठवी ते दहावी) स्वप्नाली कोळी आणि वेदिका खोत यांनी उत्तेजनार्थ प्रथम क्रमांक पटकावत सन्मानचिन्ह, प्रशस्तीपत्र आणि रोख ५०० रुपये मिळवले.

विद्याभवनच्या विद्यार्थ्यांनी सलग तिसऱ्या वर्षी ट्रॉफी जिंकत आपली वर्चस्वता सिद्ध केली आहे. त्यांच्या या घवघवीत यशाबद्दल पारिजात संस्थेचे तेजल दडस, निलेश माने, समीर दळवी, प्राजक्ता जाधव, स्नेहल जटार आणि शिल्पा गंजी यांनी कौतुकाचा वर्षाव केला. परीक्षक म्हणून नामवंत लेखक, दिग्दर्शक आणि अभिनेता निलेश माने आणि समीर दळवी यांनी कार्यभार सांभाळला.

या यशाबद्दल पुणे विद्यार्थी गृह संस्थेचे कार्याध्यक्ष राजेंद्र बोराडे, कुलसचिव दिनेश मिसाळ, मुख्याध्यापिका श्रीजा नायर, सुवर्णा मिसाळ, मनीषा मुळीक, मुख्याध्यापक जी. आर. कदम, समन्वयक पी. बी. मुळीक, पर्यवेक्षिका अस्मिता सलगर, शिक्षकवृंद आणि शिक्षकेतर कर्मचारी यांनी विद्यार्थ्यांचे मनःपूर्वक अभिनंदन केले आणि त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

# नवी मुंबई मॅन्ग्रोव्ह पार्कचे स्वागत; पावसाचे पाणी साठवण्याची पर्यावरणप्रेमींची मागणी

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई महापालिकेच्या मॅन्ग्रोव्ह पार्कच्या योजनेचे पर्यावरणवाद्यांनी स्वागत केले आहे आणि गोराई–दहिसर पट्ट्यावरील मॅन्ग्रोव्ह सेल प्रकल्पाच्या धर्तीवर हा प्रकल्प लवकरच राबविला जाईल, अशी आशा व्यक्त केली.

नॅटकनेक्ट फाउंडेशनने आठवण करून दिली की, उच्च न्यायालयाने नियुक्त केलेल्या मॅन्ग्रोव्ह संरक्षण आणि संवर्धन समितीचे अध्यक्ष असलेले तत्कालीन कोकण विभागीय आयुक्त जगदीश पाटील यांनी लोकांना भरती–ओहोटीच्या वनस्पतींचे महत्त्व कळविण्यासाठी शहरात मॅन्ग्रोव्ह पार्क उभारण्यास खूप पूर्वी सहमती दर्शविली होती.

नॅटकनेक्टचे संचालक बी.एन. कुमार म्हणाले की, जानेवारी २०१९ मध्ये उरण परिसरात एनएमएसईझेड आणि जेएनपीए अंतर्गत मॅन्ग्रोव्ह नष्ट होत असताना ही सूचना पुढे आली.

राज्य मॅन्ग्रोव्ह सेलने गोराई येथे मॅन्ग्रोव्ह पार्क प्रकल्प सुरू केला आणि तो मे पर्यंत तयार होण्याची अपेक्षा आहे. मनपाचे शहर अभियंता शिरीष अरवाद यांनी पुष्टी केली की, महापालिका शहरात खारफुटी उद्यान उभारण्यासाठी राज्य वन विभागासोबत काम करेल.

खारफुटी उद्यान लोकांना हे शिकवण्यास मदत करेल की समुद्रातील वनस्पती केवळ सामान्य 'दुर्गंधीयुक्त, दलदलीच्या, डासांनी भरलेल्या जागा नाहीत. मॅन्ग्रोव्ह सेलने म्हटल्याप्रमाणे, त्यांना निसर्गाचे सौंदर्य



आणि भरती–ओहोटीच्या वनस्पतींचे खरे मूल्य समजेल कांदळवनामुळे नागरिकांना त्सुनामी, भरती–ओहोटी, वादळ या काळात किनाऱ्यांचे रक्षण करणाऱ्या आणि यजमान मासे आणि खेकड्यांसाठी प्रजनन स्थळ म्हणून काम करणाऱ्या समुद्री वनस्पतींचे महत्त्व पटवून देण्यास मदत होईल. खारफुटी ही स्वस्त पर्जन्यवनेदेखील आहेत कारण ती स्वतःहून वाढतात, ज्यावर सरकार कोट्यवधी रुपये खर्च करते.

दरम्यान, पर्यावरणवाद्यांनी विविध नागरी कार्यालयांच्या इमारतींमध्ये पावसाचे पाणी साठवणे आणि सौरऊर्जेचा वापर करणे यासारख्या सर्वसमावेशक पर्यावरण धोरणाची मागणी केली आहे.

कुमार यांनी खेद व्यक्त केला की, पावसाचे पाणी साठवण्याचे कोणतेही धोरण नसल्यामुळे शहरातील सर्व पावसाचे पाणी थेट समुद्रात वाया जाते. म्हणूनच महापालिकेचे स्वतःचे धरण असूनही लोकांना पाणीकपातीचा सामना करावा लागतो.

खरं तर, नॅटकनेक्टने मसुदा विकास आराखड्याच्या सूचनांमध्ये असे सुचवले होते की सर्व नवीन इमारतींमध्ये सौरऊर्जा, पावसाचे पाणी साठवणे, सांडपाणी आणि कचऱ्याचे पुनर्वापर करणे यासारख्या गोष्टींची अंमलबजावणी काटेकोरपणे करावी. शहरी कचरा व्यवस्थापन हा एनएमएमसी प्रकल्प राहू नये: तो घरगुती प्रकल्प असावा; असे पर्यावरण निरीक्षकांनी विकास आराखडा वरील सुनावणीदरम्यान नागरी अधिकाऱ्यांना सांगितले. एनएमएमसीने सर्व मोकळ्या जागा आणि भूखंड ताब्यात घेण्यासाठी प्रभावी पावले उचलली पाहिजेत, आकार काहीही असोत आणि सिडकोला एनएमएमसी क्षेत्रात कोणताही नवीन विकास करण्याची परवानगी देऊ नये, असे कुमार म्हणाले.

वायू प्रदूषण रोखण्यासाठी शहराचे हिरवेगार आच्छादन वाढवण्याच्या कार्यकर्त्यांच्या मागणीला प्रतिसाद देत, मनपाने सांगितले की ते ग्रीन झोन ४० हेक्टरने वाढवण्याच्या उद्दिष्टासह ४५,००० रोपे लावणार आहे. शहरातील आठ ठिकाणी स्टॅटिक फॉग कॅनन मशीन बसवण्याची आणि धूळ दाबणारी वाहने तैनात करण्याचीही योजना आखली आहे.

पाम बीच मार्गावरील नेरूळ येथे मोठ्या प्रमाणात यजमान प्रजातींची रोपे लावून फुलपाखरू उद्यानाची योजना आखली आहे, असे अरवाद यांनी सांगितले. पुनर्विकास प्रकल्पांच्या नावाखाली अधिक काँक्रीटची जंगले निर्माण करण्याऐवजी, आपल्याला शहरी जंगले निर्माण करण्याची आवश्यकता आहे, असे कार्यकर्त्या मधु शंकर म्हणाल्या.

कोपर खैरणे आणि नेरूळ येथे निर्माण केलेली जंगले ही चांगली उदाहरणे आहेत, असे त्या म्हणाल्या आणि त्यांनी निदर्शनास आणून दिले:

# विद्यार्थ्यांना संगणक साहित्य वाटप




**नवी मुंबई : प्रतिनिधी**

जगद्गुरु रामानंदाचार्य नरेंद्राचार्य महाराज, दक्षिण पीठ नाणीजधाम, यांच्या सिद्ध पादुकांचे शुभ आगमन आणि दर्शन सोहळा जनरल अरुणकुमार वैद्य मैदान, पंतनगर घाटकोपर (पूर्व) मुंबई येथे झाला. या वेळी संस्थानाच्या वतीने शाळा व विध्यार्थ्यांना संगणक प्रोजेक्टर व दप्तर वाटप करण्यात आले.

या वेळी जगद्गुरुश्रींचे सिद्ध पादुकांचे भव्य शोभा यात्रा काढण्यात आली होती. या वेळी ज.न.म. भुषण प्रवचनकार निकम ताई यांचे प्रवचन झाले. मुंबईतील विविध शाळांना नऊ संगणक, दोन प्रोजेक्टर आणि ८० गरजू विद्यार्थ्यांना दप्तरांचे वाटप करण्यात आले. राष्ट्रीय शिक्षक संशोधन संस्था, लोअर परेल–दोन संगणक, ३० शालेय दफ्तर, प्रबोधन विद्या निकेतन एक संगणक व एक प्रोजेक्टर, शारदा नाईट हायस्कूल आणि ज्यु. कॉलेज पाच संगणक, एक प्रोजेक्टर आणि ५० शालेय दप्तर, नॅशनल प्राथमिक शाळा एक संगणक, एक प्रिंटर, सुभाषचंद्र बोस विद्या मंदिर एक संगणक, एक प्रिंटर, भैरवी विद्यालय एक संगणक, एक प्रिंटर असे साहित्यांचे वाटप मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

माजी मंत्री प्रकाश मेहता, राजोल पाटील, अजय बागल, शरद कामत, राखी जाधव, केतकी सांगळे आदी मान्यवर यावेळी उपस्थित होती. सर्व भविकांना महाप्रसादाची व्यवस्था केली होती. सुमारे १२ हजार भाविकांनी सिद्ध पादुकांचे दर्शन घेतले.

# केंद्रीय मंत्री जाधव यांचा लाईव्ह टॉक शो

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

शिवसेना नेते ना. प्रतापराव जाधव (केंद्रीय आयुष स्वतंत्र कारभार) कुटुंब कल्याण मंत्री यांचा लाईव्ह टॉक शो विष्णुदास भावे नाट्यगृह, वाशी, नवी मुंबई येथे बुधवारी (दि.५) सकाळी १० वाजता आयोजित करण्यात आलेला आहे.

या वेळी नवी मुंबईतील विविध क्षेत्रातील कर्तुत्ववान महिलांचा सत्कारदेखील करण्यात येणार असून या कार्यक्रमास मोठया संख्येने शिवसेना पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नवी मुंबईतील नागरिकांनी उपस्थित रहावे, असे आवाहन किशोर पाटकर, शिवसेना जिल्हा प्रमुख, बेलापूर विधानसभा क्षेत्र आणि सरोज पाटील महिला जिल्हाप्रमुख, बेलापूर विधानसभा क्षेत्र यांनी कळविले आहे.

# राष्ट्रीय सुरक्षा दिवस साजरा



**नवी मुंबई : बातमीदार**

देशातील नागरिकांमध्ये सुरक्षेप्रति जागरुकता निर्माण करणे आणि देशातील दुर्घटना थांबवणे हा राष्ट्रीय सुरक्षा दिवस साजरा करण्यामागचा उद्देश आहे. यानिमित्ताने नवी मुंबईतील बेलापूरमध्ये मंगळवारी (दि.४) राष्ट्रीय सुरक्षा परिषद अर्थात 'नॅशनल सेफ्टी काऊन्सिल' यांच्यावतीने ५४वा राष्ट्रीय सुरक्षा सप्ताहाचे आयोजन करण्यात आले होते.

'नॅशनल सेफ्टी काऊन्सिल' ही भारतातील विविध क्षेत्रांमध्ये सुरक्षा जागरूकता आणि अशासकीय पद्धतीने ना नफा ना तोटा या तत्वावर काम करते. या संस्थेची ४ मार्च १९६६ रोजी भारत सरकारच्या कामगार आणि रोजगार मंत्रालयाने स्थापन केलेली असून, 'नॅशनल सेफ्टी काऊन्सिल'च्या माध्यमातून रस्ता सुरक्षा, अग्नि सुरक्षा, विद्युत सुरक्षा या मोहीमेतून सर्वसान्यामध्ये जागरूकता आणि सार्वजनिक ठिकाणी अपघात कमी करण्यासंदर्भात मार्गदर्शन व उत्तम आरोग्याला प्रोत्साहन देण्यासाठी सातत्याने काम करत आहे. तसेच इतर अनेक दुर्घटना टाळण्यासाठी काय करावं या दुर्घटनांची सर्वसामान्य नागरिकांनी कोणती काळजी घ्यावी याबाबत मार्गदर्शन करण्यात येते.

यावर्षी राष्ट्रीय सुरक्षा दिनानिमित्त विकसित भारतासाठी सुरक्षितता आणि आरोग्य आवश्यक या शीर्षकाखाली निश्चित करण्यात आली.

## निवडक

### मीटर रिकॅलिब्रेशनला मुदतवाढ

**रायगड :** ३ मार्च ते ३१ मे २०२५पर्यंत ऑटोरिक्षा व मीटर टॅक्सी मीटर रिकॅलिब्रेशनला पुन्हा मुदतवाढ देण्यात आली असून सर्व परवानाधारक, वाहनचालकांनी याची नोंद घ्यावी, असे आवाहन उप प्रादेशिक परिवहन अधिकारी पेण यांनी केले आहे. प्रादेशिक परिवहन प्राधिकरण रायगड यांच्या ५ सप्टेंबर २०२४ बैठकीतील निर्णयान्वये ऑटोरिक्षा, मीटर टॅक्सी यांच्या भाडेदर वाढीस मान्यता देण्यात आली आहे. १ जानेवारी ते २८ फेब्रुवारी २०२५ या कालावधीत भाडेमीटर रिकॅलिब्रेशन करून १ जानेवारी २०२५ रोजी प्रसिध्दीपत्रकाद्वारे कळविण्यात आले होते.

### निर्मलसिंग रंधावा यांना पुरस्कार



**माणगाव :** मार्शल आर्ट्स स्पोर्ट्स अकॅडमीचे अध्यक्ष कल्पेश शिंदे आणि पत्रकार मित्र संघाचे अध्यक्ष सचिन वामन साळुंखे यांच्या संयुक्त विद्यमाने माणगाव येथील सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रात अग्रगण्य असणाऱ्या चारिझेन फाउंडेशनचे अध्यक्ष कॅप्टन निर्मलसिंग रंधावा यांना रायगड कोकणरत्न वर्ष २०२५ चा उत्कृष्ट सामाजिक पुरस्काराने रविवारी नागोठणे याठिकाणी झालेल्या कार्यक्रमात गौरव करण्यात आला. कॅप्टन निर्मलसिंग रंधावा हे माणगाव तालुक्यासह सबंध रायगड जिल्ह्यात सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रात गेली अनेक वर्ष काम करीत आहेत.

### माणगावच्या कौस्तुभ गांगणची निवड



**माणगाव :** माणगाव शिक्षण प्रसारक मंडळाचे द. ग. तटकरे महाविद्यालय माणगाव येथील विद्यार्थी कौस्तुभ गांगण याची आयआयटी मद्रासमध्ये डेटा सायन्स अभियांत्रिकीसाठी निवड झाली असून सर्व माणगाव शहरातून त्याचारवर कौतुकाचा वर्षाव होत आहे. कौस्तुभ म्हणतो, भविष्यातही माझ्या महाविद्यालयाचा अभिमान वाढवण्याचा मी प्रयत्न करत राहीन. या विद्यार्थ्याच्या अतुलनीय कामगिरीचे कौतुक संस्थेचे अध्यक्ष राजीव साबळे साहेब सर्व महाविद्यालय विकास समिती सदस्य, विज्ञान विभाग प्रमुख. प्रा. मेहरीन डावरे, प्रा. रफिक गुरकर, प्रा. डॉ. नमिता मोरे व सर्व प्राध्यापक व शिक्षकेत्तर कार्मचारी यांनी केले आणि कौस्तुभला पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# मुंबई-पुणे एक्सप्रेस वेवर ट्रकला आग

## बोगद्यात धुराचे लोट

**खोपोली : प्रतिनिधी**

मुंबई पुणे एक्सप्रेसवेवर मंगळवारी पहाटे एका केबल वाहून नेणाऱ्या ट्रकला भीषण आग लागल्याची घटना घडली असून या आगीमुळे बोगद्यात काही काळ मोठ्या प्रमाणात धुर पसरला होता,



मुंबई-पुणे एक्सप्रेसवेवरून ट्रक (एमएच ४३ बीएक्स ७९६७) वरील चालक राहुल जायप्रकाश यादव (वय २७, रा. रोडपाली कळंबोली मूळ रा. उत्तर प्रदेश) हा ट्रक विशाखापट्टणम ते तळोजा यात लोखंडी रिंगा घेऊन जात असताना तो बोरघाटात नवीन बोगद्यात आला असता शॉर्टसर्किटमुळे त्याला आग लागली. या प्रचंड आगीमुळे बोगद्यात मोठ्या प्रमाणात धूर पसरला होता. त्यामुळे येथील काही वाहनात असलेले प्रवाशांना तत्काळ बोगद्याबाहेर काढल्याने मोठी दुर्घटना टळली आहे, मात्र त्याने प्रवाशांना श्वसनाचा त्रास जाणवू लागला होता,

या घटनेची माहिती मिळताच, खोपोली पोलीस, बोरघाट पोलीस, आयआरबी यंत्रणा, डेल्टा फोर्स, महाराष्ट्र सुरक्षा बल देवदूत यंत्रणा, खोपोली नगरपालिकेचे अग्निशमन दल आदी तात्काळ घटनास्थळी दाखल झाले, मात्र एक तासाच्या अथक प्रयत्नांनंतर ही आग विझवण्यात यश आले, मात्र काही काळानंतर हायड्राच्या साहाय्याने ट्रक बोगद्यातुन बाजूला घेऊन वाहतूक चालू करण्यात आली होती.

आगीत ट्रकचे समोरील भागाचे टायर व केबीन जळून नुकसान झाले. ट्रक लोखंडी मालाने भरलेला असल्यामुळे बोगद्यातून बाहेर काढणे अवघड झाले होते. पूलर व हायड्राच्या मदतीने जळीत ट्रक बाहेर काढण्यात आला. आगीमुळे मुंबई वाहिनीवरील वाहतूक थांबल्याने तसेच बोगद्या समोर दोन ट्रक पंक्चर झाल्याने व एक कंटेनर, एक टेम्पो बंद पडल्याने सुमारे दोन तास वाहतूक कोंडी झाली होती.ही घटना बोरघाटातील खोपोली बायपास जवळ असणाऱ्या नवीन बोगद्यात पहाटे २.३० वा. सुमारास घडली.

## रायगड जिल्हा परिषद शाळा नेणवली येथे राष्ट्रीय विज्ञान दिन

**पाली : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यातील सुधागड तालुक्यातील नेणवली येथील जिल्हा परिषद शाळेत राष्ट्रीय विज्ञान दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या निमित्ताने विद्यार्थ्यांनी विविध विज्ञान प्रयोग सादर करून विज्ञान प्रदर्शन भरवले होते.

विज्ञान दिनानिमित्त विद्यार्थीनी विज्ञान रांगोळी रेखाटली. त्यानंतर शाळेच्या मुख्याध्यापक राजेंद्र अंबिके यांनी विज्ञान दिनाचे महत्त्व सांगितले. या प्रदर्शनात टेलिस्कोप हे प्रमुख आकर्षण होते त्याच लाभ विद्यार्थ्यांनी घेतला. आज शाळेत मुलांनी रोबोटीक्स साहित्य जोडून विविध प्रयोग स्वतः बनवले व वैज्ञानिक आनंद घेतला.

या प्रदर्शनात विद्यार्थ्यांनी सौरऊर्जेचा वापर आधारित सोलर कार, जलशुद्धीकरण, मानवी श्वसनसंस्था, पवनचक्की, रोबोटिक्स यांसारख्या विविध विषयांवर प्रयोग सादर केले. विद्यार्थ्यांनी टाकाऊ वस्तूंपासून बनवलेले प्रयोग विशेष लक्ष वेधून घेत होते.

या प्रदर्शनात विद्यार्थ्यांनी अतिशय उत्साहाने सहभाग घेतला. त्यांनी आपल्या प्रयोगांची माहिती अतिशय सोप्या भाषेत समजावून सांगितली. या प्रदर्शनातून विद्यार्थ्यांमधील वैज्ञानिक दृष्टिकोन आणि आत्मविश्वास दिसून आला. या प्रदर्शनाला विज्ञान शिक्षक शंकर जाधव यांनी विशेष मेहनत घेऊन हा दिन यशस्वी केला.



## श्री सदस्यांची पेण शहरात स्वच्छता मोहीम

**पेण : प्रतिनिधी**

महाराष्ट्र भूषण डॉ.श्री. नानासाहेब धर्माधिकारी यांच्या जयंती निमित्त पेण येथील डॉ.श्री. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानच्या श्री सदस्यांच्या वतीने रविवारी पेण शहरात स्वछता अभियान राबविण्यात आले. या स्वछता अभियान मधून पेण शहरातून २१.९९ टन कचरा गोळा केला. या वेळी पेण तालुक्यातील १६ बैठकांतील १ हजार ८१ श्री सदस्य उपस्थित होते. पेण शहरातील २१ किलोमीटर लांबीचे रस्ते स्वच्छ करण्यात आले.



### २१ टन कचरा केला गोळा

या वेळी पेण तहसील, वनविभाग, पोलीस स्टेशन, तालुका दिवाणी न्यायालय, उपविभागीय अधिकारी, उपजिल्हा रुग्णालय, नगरपालिका कार्यालय, सार्वजनिक बांधकाम कार्यालय, पेण रेल्वे स्टेशन परिसर, पेण स्मशानभूमी, रामवाडी बस स्थानक, रामवाडी एसटी विभागीय कार्यालय, आरटीओ कार्यालय आदी बरोबरच कुंभार आळी, म्हाडा कॉलनी, नंदीमाळ नाका, शिवाजी चौक, हनुमान मंदिर ते चावडी नाका, न्यायालय ते बस स्टँड, नगरपालिका ते चिंचपाडा रोड, प्रायव्हेट हायस्कूल ते शिवाजी चौक रोड , उत्कर्षनगर, पेण एसटी स्टँड ते चावडीनाका आदि सर्व शहरात तसेच शासकीय कार्यालय परिसरात हे स्वच्छता अभियान राबविण्यात आले.

या स्वछते मोहिमेतून १५.२७ टन सुका कचरा व ६.७१ टन ओला कचरा असा २१. ९९ टन कचरा गोळा करुन पेण नगरपालिकेच्या कचरा डेपो येथे नेण्यात आला. या स्वच्छता मोहिमेत पेण नगरपालिका मुख्याधिकारी जीवन पाटील, आरोग्य अधिकारी दयानंद गावंड, मुख्य लेखापाल किरण शहा, पेण नगरपरिषद, उप जिल्हा रुग्णालय, पेण दिवाणी व फौजदारी न्यायालय, पेण पोलीस स्टेशन, पेण वनविभाग व इतर सरकारी कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी सहभागी झाले होते.

## अलिबागच्या टॅक्सी चालक मालक संस्थेतर्फे नेत्र तपासणी शिबिर

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

पिवळी काळी टॅक्सी चालक मालक संस्था अलिबागतर्फे श्री सत्यनारायणाची महापूजा झाली. तसेच बहुसंख्य भाविकांनी प्रसादाचा लाभ घेतला त्याचप्रमाणे महापूजा निमित्त नेत्र शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

याला अलिबाग तालुक्यातील अनेक नागरिकांचा प्रतिसाद मिळाला तसेच मोफत तपासणी करण्यात आली तसेच संस्थेचे अध्यक्ष व सर्व पदाधिकारी यांच्या वतीने विविध मान्यवरांचा सन्मान करण्यात आला तसेच शिबिरातील डॉक्टर नर्स यांचा संस्थेच्या वतीने सन्मान करण्यात आला. टॅक्सी चालक मालक संस्थेच्या विविध सामाजिक उपक्रमाबद्दल अनेक मान्यवरांनी संस्थेचे व पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन केले.


संस्थेचे अध्यक्ष सुभाष परब, उपाध्यक्ष भूषण भालेकर, पदाधिकारी दत्ताराम म्हात्रे, दिलीप म्हात्रे, संजय पाटील व सर्व सभासद यांनी सर्वांचे आभार मानले.



## डॉ. सुनील पाटील यांना पुरस्कार प्रदान

**नागोठणे : बातमीदार**

रायगड कोकण पुरस्कार संस्थेच्या वतीने जिल्ह्यातील व्यक्तींचा गुणगौरव सोहळा आयोजित करण्यात येत असतो त्याच अनुषंगाने रविवारी नागोठणे झालेल्या या सोहळ्यात नागोठण्यातील प्रसिद्ध माया लक्ष्मी नर्सिंग होमचे संचालक डॉ.सुनील पाटील यांना वैद्यकीय क्षेत्रात उल्लेखनीय कामागिरी केल्याबद्दल मान्यवरांच्या हस्ते रायगड कोकण रत्न पुरस्कार २०२५ प्रदान करण्यात आला.



डॉ.सुनील पाटील यांना पुरस्कार मिळाल्याने त्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे. रायगड कोकण रत्न पुरस्कार सोहळ्यास प्रमुख अतिथी म्हणून पेण प्रायव्हेट एज्युकेशनचे अध्यक्ष ॲड. मंगेश नेने, अरुण शिर्के साहेब बिर्ला कंपनीचे व्हाईस प्रेसिडेंट अरुण शिर्के तसेच संस्थेचे अध्यक्ष सचिन साळुंखे, उपाध्यक्ष कल्पेश शिंदे, सेक्रेटरी रिया पाटील, ब्लॅक बेल्ट करण जाधव, ब्लॅक बेल्ट प्रथमेश म्हात्रे यांच्या सह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

दरम्यान, नागोठणे विभागातील आणि रायगड जिल्ह्यातील एक मोठ वलय असलेलं व्यक्तिमत्व, वैद्यकीय क्षेत्रातील तळपता सूर्यपुत्र, सामाजिक, राजकीय, क्रिडा क्षेत्रातील कोहिनुर, माणूसकीचा महामेरू अशी प्रतिमा असलेले डॉ.सुनील पाटील यांना रायगड कोकणरत्न पुरस्कार देऊन संस्थेने फार मोलाचे कार्य केले असल्याची प्रतिक्रिया नागोठणे दिल्या जात आहेत.

## संतोष रेडीज सेवानिवृत्त

**मुरुड : प्रतिनिधी**

अशोक ल.लोखंडे विद्यामंदिर या माध्यमिक हायस्कूल मधील मुख्याध्यापक पदावर कार्यरत असणारे संतोष महादेव रेडीज हे आपल्या ३४ वर्षाच्या प्रदीर्घ कालावधी नंतर सेवा निवृत्त झाले आहेत. ते आपल्या कारकिर्दीत प्रदीर्घ काळ मुख्याध्यापक म्हणून यशस्वी कारकिर्द केली आहे.

संस्थेच्या व विद्यालयाच्या वतीने संतोष महादेव रेडीज यांना शाल, श्रीफळ, सन्मान चिन्ह देऊन यथोचित गौरव करण्यात आला. या वेळी संस्थेचे अध्यक्ष खेळूशेठ वाजे व सचिव संजयजी रेडीज यांच्या हस्ते मुख्याध्यापक यांचा सत्कार करण्यात आला.



या वेळी उपस्थित शिक्षक व मान्यवरांनी आपले विचार व्यक्त करताना मुख्याध्यापक संतोष रेडीज यांच्या कारकिर्दीचा आढावा घेऊन केलेले बहुमूल्य कार्य विषद केले. सदरील कार्यक्रमास असंख्य ग्रामस्थ व माजी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पोलीस नामदेव बंडगर यांचा सत्कार

**मुरुड : प्रतिनिधी**

केंद्रीय गृहमंत्रालयाद्वारे दिला जाणारा सर्वोत्कृष्ट पोलीस स्टेशन २०२४चा पुरस्कार पालघर येथील कासा पोलीस स्टेशनला मिळाला आहे. ठाणे येथे झालेल्या समारंभात महाराष्ट्र राज्य मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते नामदेव बंडगर यांनी हा पुरस्कार स्वीकारला आहे. सध्या नामदेव बंडगर हे मुरुड जंजिरा येथील पोलीस ठाण्यात कार्यरत आहेत.




त्यांनी स्थानिक सोशल मीडिया ॲक्टीव असणारा तरुण वर्ग सोबत घेऊन बालविवाह, दारू, अंमली पदार्थ यांसारख्या अनेक समस्यांवर जनजागृतीचे कार्यक्रम हाती घेतले होते. नामदेव बंडगर यांनी स्थानिक भाषेला प्राधान्य देऊन प्रबोधन केले. झालेले आंदोलन न्याय हक्कांसाठी लढणाऱ्या लोकांवर गुन्हे दाखल न करता त्यांच्यावर झालेल्या अन्यायाबाबत संबंधित विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांमार्फत मार्ग काढण्यास मदत केली होती.

त्यांच्या या कार्याची दखल घेत त्यांना गौरवण्यात आले आहेत. त्यांना हा पुरस्कार प्राप्त होताच मुरुड तालुक्यातील विविध सामाजिक संस्था व मान्यवर यांच्याकडून अभिनंदन होत आहे.

## विवा कॉलेजचे प्राचार्य डॉ. विवेक ढेपे यांना पुरस्कार

**माणगाव : प्रतिनिधी**

मार्शल आर्ट्स स्पोर्ट्स अकॅडमीचे अध्यक्ष कल्पेश शिंदे आणि पत्रकार मित्र संघाचे अध्यक्ष सचिन वामन साळुंखे यांच्या संयुक्त विद्यमाने माणगाव येथील शैक्षणिक क्षेत्रात अग्रेसर असणाऱ्या विवा कॉलेजचे प्राचार्य डॉ. विवेक ढेपे यांना रायगड कोकण रत्न वर्ष २०२५चा उत्कृष्ट क्रीडा पुरस्काराने रविवारी (दि.२) नागोठणे जि.रायगड याठिकाणी झालेल्या कार्यक्रमात सन्मानित करण्यात आले.



सामाजिक कार्यकर्ते विशाल जाधव, सामाजिक कार्यकर्त्या सुवर्णा जाधव यांच्याहस्ते तसेच रायगड कोकण रत्न पुरस्कार समिती अध्यक्ष संपादक सचिन साळुंखे, मार्शल आर्ट्स स्पोर्ट्स अकॅडमीचे अध्यक्ष मास्टर कल्पेश शिंदे व मान्यवरांच्या उपस्थितीत ढेपे यांचा गौरव करण्यात आला. हा पुरस्कार डॉ. विवेक ढेपे यांनी आपली पत्नी विनया ढेपे, मुलगी विवा यांच्या समवेत स्वीकारला.

डॉ.ढेपे यांना मिळालेल्या या पुरस्काराबद्दल त्यांचे शिवजयंती उत्सव व रक्तदान शिबीर सेवाभावी संस्था माणगाव,विवा कॉलेज माणगाव यांनी विशेष अभिनंदन करून त्यांचे सर्वस्तरांतून विशेष अभिनंदन होत आहे.

## मराठी भाषा गौरव दिनानिमित्त अलिबाग येथे पोपटी काव्यसंमेलन

**नागोठणे : बातमीदार**

मराठी भाषा गौरव दिनाचे औचित्य साधून साहित्यसंपदातर्फे अलिबागमध्ये नुकतेच पोपटी काव्यसंमेलन पार पडले. पोपटी काव्यसंमेलनात साहित्यसंपदा संस्थापक वैभव धनावडे यांच्या संकल्पनेतून साकारलेला 'जगलेल्या कविता' -प्रयोग क्रमांक १५ झाला.

संमेलनात रायगड, मुंबई, पुणे येथील विविध कवींनी सहभाग नोंदविला. रायगडभूषणकार रमेश धनावडे यांनी संमेलनाचे अध्यक्षस्थान भूषविले. स्मिता हर्डीकर यांनी आपल्या गझला सादर करून श्रोत्यांची वाहवा मिळवली. अलिबाग मधील कवी दिलीप मोकल, नवी मुंबई येथील 'तीळ' फेम कवी लालसिंग वैराट, पुण्याहून उपस्थित राहिलेल्या कवयित्री अर्चना गोरे, प्रांजली मोहिते यांनी आपल्या कविता सदर संमेलनात सादर केल्या.

'कवितेचे घर' संकल्पनाकार श्रीकांत पेटकर यांनी आपल्या कवितां सोबत मराठीतील नामवंत कवींच्या कविता सादर करून वैभवशाली मराठी साहित्य परंपरा उलगडून दाखवली. तेजस्विनी फाउंडेशन अध्यक्षा ॲड.जीविता पाटील यांनी आपल्यातील कवयित्रीचे दर्शन घडवत स्वलिखित कविता सादर केल्या. कार्यक्रमास उज्वल भविष्य सामाजिक संस्था अध्यक्षा उज्वला चंदनशिव यांनी विशेष उपस्थिती दर्शवली. नॉम नॉम रेस्टॉरंटचे संजय पाटील यांनीसुद्धा आपल्या सुमधुर आवाजात काही गाणी सादर करून कार्यक्रमाची रंगत वाढवली.

साहित्यसंपदातर्फे नुकतेच प्रकाशित झालेल्या, प्रांजली मोहिते यांच्या 'मिलाफ' या चित्रकाव्य संग्रहातील काही निवडक कवितांचे वाचन पार पडले. अर्चना गोरे यांच्या 'वनमाला' काव्यसंग्रहात राजश्री पाटील यांनी केले. प्रेक्षक म्हणून अमित हर्डीकर आणि पूनम धनावडे यांनी रायगडमधील साहित्यिक मराठी भाषा संवर्धनास हातभार लावतील, असे मत नोंदविले.

रमेश धनावडे आणि दिलीप मोकल यांच्या साहित्यसंपदा प्रकाशनातर्फे येणाऱ्या आगामी काव्यसंग्रहास शुभेच्छा देऊन कार्यक्रमाची सांगता झाली. योगेश टोपले यांचे विशेष सहकार्य लाभले.



# कोण होणार दिल्ली कॅपिटल्सचा कर्णधार?

## टीम इंडियातील दोन खेळाडूंमध्ये तगडी स्पर्धा

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

इंडियन प्रीमिअर लीग स्पर्धा आता अवघ्या काही दिवसांवर आली आहे. या स्पर्धेत सहभागी १० सघांपैकी नऊ फ्रँचायझी संघांनी यंदाच्या हंगामासाठी आपल्या कॅप्टनची निवड केलीये. कोलकाता नाईट रायडर्स संघाने अनुभवी भारतीय क्रिकेटर अजिंक्य रहाणेकडे नेतृत्वाची जबाबदारी दिलीये. आता फक्त दिल्ली कॅपिटल्स संघ असा आहे, ज्या संघाने अजून आपल्या कर्णधाराची निवड केलेली नाही.

ऋषभ पंत संघाबाहेर पडल्यावर त्याची जागा कोण घेणार? अशी चर्चा सध्या रंगताना दिसत आहे. सध्याच्या घडीला कॅप्टन्सीच्या शर्यतीत दोन नावे आघाडीवर आहेत. ते दोन क्रिकेटर म्हणजे अष्टपैलू अक्षर पटेल आणि लोकेश राहुल. एका बाजूला राहुलला आयपीएलमध्ये




वेगवेगळ्या फ्रँचायझीकडून कॅप्टन्सीचा अनुभव आहे. दुसरीकडे अक्षर पटेल याला काही दिवसांपूर्वीच टीम इंडियाच्या टी-२० संघाचा उपकर्णधार करण्यात आले आहे. त्यामुळे या दोघांतील एकाची निवड करण्याला दिल्ली संघ पसंती देईल.

लोकेश राहुल याला कॅप्टन्सीचा तगडा अनुभव आहे. आयपीएलमध्ये कॅप्टन्सीत त्याने चांगली कामगिरी केलीये, पण संघाकडून सर्वोत्तम कामगिरी करून घेण्यात तो कुठंतरी कमी पडलाय. हीच गोष्ट अक्षर पटेलच्या फायद्याची ठरू शकते. याशिवाय भारतीय टी-२० संघाचा उपकर्णधार असल्याशिवाय सध्याच्या घडीला अक्षर हा नियमित संघाचा भाग राहणारा हुकमी एक्का ठरतोय. चॅम्पियन्स ट्रॉफी स्पर्धेत बढती मिळाल्यावर दबावात संघाला सावरण्याची आपल्यातील धमकही त्याने दाखवून दिलीये. त्यामुळे कॅप्टन्सीच्या शर्यतीत त्याने बाजी मारली तर नवल वाटणार नाही.

# टीम इंडियाची पद्माकर शिवलकरांना आदरांजली

**दुबई : वृत्तसंस्था**

भारताचे देशांतर्गत क्रिकेटमधील मोठे नाव असलेले फिरकीपटू पद्माकर शिवलकर यांचे सोमवारी निधन झाले. त्यांना आदरांजली म्हणून भारतीय संघ मंगळवारी (दि. ४) चॅम्पियन्स ट्रॉफीमध्ये ऑस्ट्रेलियाविरुद्ध झालेल्या सेमी फायनलच्या सामन्यात हातावर काळी पट्टी बांधून उतरला होता.

भारतातील सर्वोत्तम डावखुऱ्या फिरकीपटूंपैकी एक पद्माकर शिवलकर यांचे सोमवारी मुंबईत निधन झाले. ते ८४ वर्षांचे होते आणि गेल्या काही महिन्यांपासून आजारी होते. शिवलकर यांनी देशाच्या राष्ट्रीय संघात खेळण्याची संधी मिळाली नाही, पण १९६० आणि ७०च्या दशकात जेव्हा मुंबईचा देशांतर्गत क्रिकेटमध्ये दबदबा होता तेव्हा शिवलकर



यांचे नाव मोठे होते. २०१७मध्ये शिवलकर यांना बीसीसीआय सीके नायूडू जीवन गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले होते.

शिवलकर यांना भारताच्या राष्ट्रीय संघात खेळण्याची संधी मिळाली नाही, पण निवृत्ती घेतल्यानंतर शिवलकर यांनी मुंबई रणजी ट्रॉफी संघाचे प्रशिक्षक म्हणूनदेखील काम केले. त्यांनी अनेक प्रतिभावान खेळाडूंना घडवले. जसे की हरमीत सिंग, जो अंडर १९ आणि मुंबईसाठी खेळला आणि पुढे यूएसए संघात सहभागी झाला.

तो काळ फिरकी गोलंदाजीच्या सुवर्णयुगाचा होता, त्यामुळे दर एका भारतीय फिरकीपटूमागे पाच संधी न मिळालेले प्रतिभावानही असायचे. त्या काळी मुंबई संघात आणि भारतीय संघात होते साक्षात बापू नाडकर्णी. ते १९६८पर्यंत खेळत होते. त्यांच्यानंतर भारतीय संघातून खेळू लागले बिशनसिंग बेदी! बेदी, प्रसन्ना, चंद्रा, वेंकट ही फिरकी चौकडी चमकत असताना (वास्तविक चौघे क्वचितच एकत्र खेळले) शिवलकरांसाठी संधी दुरावतच गेली, पण ते प्राक्तन त्यांनी खूप आधीच स्वीकारले. त्यामुळे खेळपट्टीला वाहिलेल्या या फिरकी अवलियाने जवळपास पन्नाशीपर्यंत क्रिकेटची सेवा करण्यात धन्यता मानली.

# सोनिया वाघमारेची राष्ट्रीय स्क्वॉश स्पर्धेसाठी निवड

## राज्य स्पर्धेत 'कांस्य'




**मोहोपाडा : प्रतिनिधी**

राज्य क्रीडा व युवक सेवा संचालनालय आयोजित राज्यस्तरीय शालेय स्क्वॉश क्रीडा स्पर्धा पुणे येथे नुकतीच झाली. या स्पर्धेत चौक (ता. खालापूर) येथील सरनौबत नेताजी पालकर विद्यामंदिर व यशवंतराव देशमुख कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थिनी सोनिया संदीप वाघमारे हिने कांस्यपदक पटकाविले. तिची दिल्ली येथे होणाऱ्या राष्ट्रीय स्पर्धेसाठी महाराष्ट्र संघात निवड झाली आहे.

याबद्दल सोनिया व तिचे प्रशिक्षक प्रशिक्षक शरद कुंभार यांचे विद्या प्रसारिणी सभा चौक संस्थेचे उपाध्यक्ष अॅड. अविनाश देशमुख, कार्याध्यक्ष शोभाताई देशमुख, उपकार्याध्यक्ष नरेंद्र शहा, सेक्रेटरी योगेंद्र शहा, शाळेच्या मुख्याध्यापिका, उपमुख्याध्यापक, पर्यवेक्षक, शिक्षकवृंद, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी व पालकांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# साईभक्त ब्लास्टरने जिंकली क्रिकेट स्पर्धा

**नवी मुंबई : बातमीदार**

सानपाडा येथील साईभक्त सेवा मंडळाच्या वतीने कै. दिनेश विठ्ठल आमले यांच्या स्मरणार्थ स्मृती चषक २०२५ साईभक्त प्रीमियर लीगचे आयोजन सेक्टर ८मधील बाबू गेनू मैदानावर करण्यात आले होते. प्रकाशझोतात झालेल्या या स्पर्धेचे संघमालक शारदा पांडुरंग आमले यांच्या साईभक्त ब्लास्टर सेक्टर ७ संघाने विजेतेपद पटकावले.

या क्रिकेट सामन्यासाठी सानपाडा विभागातील सर्व सेक्टरमधून प्रत्येकी दोन संघ अशा संकल्पनेतून एकूण १८ संघांचे सामने खेळविण्यात आले होते. स्पर्धेचे उद्घाटन बेलापूर विधानसभेच्या आमदार मंदा म्हात्रे यांच्या हस्ते झाले. स्पर्धेस भाजपचे बेलापूर विधानसभा संयोजक निलेश म्हात्रे, अखिल भारतीय



माथाडी संघटनेचे प्रदेश उपाध्यक्ष विजय बुवा कुलकर्णी, माजी नगरसेवक सोमनाथ वासकर, सुनील कुरकुटे, शिरीष पाटील, विश्वास बोऱ्हाडे, भावेश पाटील, विसाजी लोके, विकास गाढवे अविनाश जाधव, गणेश पावगे, राजेश ठाकूर उपस्थित होते.

संघमालक सुनील कुरकुटे यांच्या साईभक्त रायडर्स सेक्टर १० या संघाने उपविजेतेपद प्राप्त केले, तर संघमालक ब्रम्हानंद शेळके यांच्या साईभक्त हिरोज सेक्टर ८ या संघाला तिसऱ्या क्रमाकांवर समाधान मानावे लागले. उत्कृष्ट फलंदाज आवेश फारुकी, उत्कृष्ट गोलंदाज विवेक भगत, उत्कृष्ट क्षेत्ररक्षण ओंकार काबुगडे आणि मालिकावीर ओमकार टोणपे यांना गौरविण्यात आले.

# आमदार चषक क्रिकेट स्पर्धेला शुभारंभ

**अलिबाग : प्रतिनिधी**

पनवेल क्रिकेट स्पोर्ट्स अकॅडमी व माणुसकी प्रतिष्ठान रायगड यांच्या संयुक्त विद्यमाने रसायनी पाताळगंगा येथील नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ सिक्युरिटी मार्केट्सच्या मैदानावर अलिबाग मुरूड विधानसभेचे आमदार महेंद्र दळवी चषक ज्युनिअर वयोगट, एकदिवसीय लेदर बॉल क्रिकेट स्पर्धेला प्रारंभ झाला.

माणुसकी प्रतिष्ठान रायगडचे अध्यक्ष डॉ.राजाराम हुलवान यांच्या हस्ते स्पर्धेचे उद्घाटन करण्यात आले. या स्पर्धेत रायगड जिल्ह्यातील आठ संघांनी सहभाग घेतला आहे. प्रथम लीग व त्यानंतर बाद फेरीनुसार स्पर्धा होईल.

उद्घाटन समारंभास रायगड



जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे मुख्य प्रशिक्षक शंकर दळवी, सदस्य अॅड. पंकज पंडित, प्रदीप खलाटे, प्रशिक्षक नयन कट्टा, आरपीएल सहसचिव संदीप जोशी, पनवेल तालुका क्रिकेट असोसिएशनचे उपाध्यक्ष पंकज पाटील, राजरत्न मोरे, सुशांत पवार, सुनील सरगर, निशांत माळी, आदेश नाईक आदी उपस्थित होते.

# पुरुष, महिला जिल्हा निवड चाचणी खो-खो स्पर्धा रविवारी पनवेलला

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा खो-खो असोसिएशनतर्फे ३०वी पुरुष, महिला गट जिल्हा अजिंक्यपद निवड चाचणी खो-खो स्पर्धा आशीर्वाद कामोठे ग्रेल्स यांच्या यजमानपदाखाली आयोजित करण्यात आली आहे. पनवेल शहरातील जिल्हा क्रीडा प्रशिक्षण केंद्र येथे ही स्पर्धा रविवारी (दि.९) खेळवली जाणार आहे.

रायगडचे पुरुष व महिला खो-खो संघ पनवेल येथे होणाऱ्या निवड चाचणी स्पर्धेतून निवडले जातील. हे संघ ६०व्या पुरुष, महिला राज्य अजिंक्यपद व निवड चाचणी खो-खो स्पर्धेत सहभागी होतील.

संलग्नता शुल्क २०० रुपये, प्रवेश शुल्क २०० रुपये, खेळाडू नोंदणी शुल्क १५० रुपये आकारण्यात येणार आहे. प्रवेश स्वीकारण्याची मुदत ६ मार्च रोजी सायंकाळी ५ वाजेपर्यंत आहे. संपूर्ण माहिती भरलेले प्रवेश



अर्ज ashish19.patilgmail.com येथे पाठवावेत. निवड चाचणीच्या अधिक माहितीकरिता विशाल शिंदे रोहा (९९७५२४२५८८), राकेश म्हात्रे (अलिबाग) ९६८९८२२७५९, ऋतिक पवार (८२८६८००९९०), शुभम कांबळे (८४१९९६६७९८) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन रायगड जिल्हा खो-खो असोसिएशनचे कार्यवाह आशिष पाटील यांनी केले आहे.









# लोणेरे येथे दमदार आमदार प्रीमिअर लीग

**रेवदंडा : प्रतिनिधी**

अलिबाग, मुरुड आणि रोहा तालुक्यातील खेळाडूंना प्रोत्साहित करणारी महेंद्रशेठ दळवी फाउंडेशन पुरस्कृत दमदार आमदार प्रीमिअर लीग अलिबागमधील लोणेरे येथे आयोजित करण्यात आली आहे. या स्पर्धेचे उद्घाटन बुधवारी (दि.५) सायंकाळी ५.३० वाजता आमदार महेंद्र दळवी यांच्या हस्ते होणार आहे.

डे-नाईट पद्धतीने १० मार्चपर्यंत स्पर्धा तलवार मैदानावर खेळविण्यात येणार आहे. प्रथम क्रमांक विजेत्या संघास पाच लाख ५५ हजार ५५५ रुपये, व्दितीय तीन लाख ३३ हजार ३३३ रुपये, तृतीय व चतुर्थ क्रमांकास एक लाख ५५ हजार ५५५ रुपये आणि चारही विजेत्यांना भव्य चषक देण्यात येणार आहेत. याशिवाय उत्कृष्ट गोलदांज, फलदांज, क्षेत्ररक्षक व नवोदित खेळाडू यांना आकर्षक बक्षिसे ठेवण्यात आली आहे. या बक्षिसामध्ये तीन मोटरसायकल व अंतिम विजेत्या संघमालकास थार फोर व्हीलर गाडी देण्यात येईल.









दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com